- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, ३ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २९४ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# समृद्धी महामार्गावर ट्रक-ट्रॅक्टरची धडक, ७ जणांचा मृत्यू, २१ जण जखमी

## हे सर्वजण सोमनाथ लेआउट सिंधी मेघे वर्धा येथील रहिवासी

**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**

धामणगाव रेल्वे (अमरावती) - शेगाव वरून दुर्गादेवीची मूर्ती घेऊन वर्धा जात असताना धामणगाव जवळ चॅनल ९७ येथे झालेल्या अपघातात वर्धा येथील पाच जण जागीच ठार तर २१ जण गंभीर जखमी झाल्याची घटना रात्री एक वाजता दरम्यान घडली. जखमींना तातडीने धामणगाव ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. तर रुग्णालयात उपचारादरम्यान आणखी दोघांचा मृत्यू झाल्याने मृतांची संख्या ७ वर पोहोचली आहे.

मृतकामध्ये दत्ता कुरसंगे (५५त्न, प्रवीण बकाने (५०), घनश्याम पाटील (६०), गोलू उर्फ सचिन बादलमवार (३८) ओम गावंडे (२२) यांचा समावेश आहे. हे सर्वजण सोमनाथ लेआउट सिंधी मेघे येथील रहिवासी होते. तर गंभीर जखमींमध्ये दिनेश रामकृष्ण पोहणकर (३५), नरेंद्र प्रल्हाद संयाम (४९), मुनेश्वर देवराव ढोले (५३), सागर मुनेश्वर ढोले (२७), रोशन राऊत (२६) सतीश वसंत राऊत (४३) सतीश पांडुरंग खाडे (३५), अनिल मारोतराव मसराम (४७) दिनेश पांडुरंग नानवटे (४०), नयन सुधीर खानजोडे (२९), यश रवी मलकापुरे (३०) अमित अनिल आडे (२५) यांचा समावेश आहे. हे सर्वजण सोमनाथ लेआउट सिंधी मेघे वर्धा येथील आहे.

तर किरकोळ जखमींमध्ये प्रतिक रामदास शिरसकर (३१), अनुज अनिल आडे (२३), दुर्गेश यशवंत भिसेन (३०), आर्यन प्रभाकर वैद्य (१९) शुभम शामसुंदर ढबाले (३०), प्रणय प्रभाकर ढोले (33) हे सर्व सोमनाथ ते लेआउट सिंधी मेघे येथील रहिवासी आहे. वर्धा येथील हे भाविक शेगाव येथून दुर्गा देवी घेऊन बोलोरो पिकप क्रमांक एम एच ०५ बी एच ५७९३ ने मागच्या बाजूला ट्रॉली लावून वर्धा येथे धीम्या गतीने जात होते दरम्यान याच वेळी सोळा चक्के ट्रॅक क्रमांक सी जी ०७ सी झेड ८८५५ ने मागून धडक दिली या भीषण अपघातात पाच जण जागीच ठार झाले गंभीर जखमींना सावंगी मेघे येथील रुग्णालयात हलविण्यात आले यातील पाच जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही नवरात्रौत्सवासाठी दुगार्मातेची मूर्ती आणण्याची तयारी या मंडळाकडून सुरू होती. मात्र, देवीची मूर्ती घेऊन परतत असतानाच झालेल्या या भीषण दुर्घटनेने उत्सवाच्या आनंदावर दुःखाचे सावट आले आहे. एका बाजूला नवरात्रौत्सवाच्या स्वागताची तयारी सुरू असताना दुसऱ्या बाजूला मंडळातील कार्यकर्त्यांच्या मृत्यूमुळे वर्धा आणि परिसरात शोक व्यक्त केला जात आहे.



ही सर्व तरुण मंडळी २८ तारखेस शेगावला पोहचली होती. बोलेरो पिकअप वाहनाने ३० सप्टेंबर रोजी त्यांचा मूर्तीसह परतीचा प्रवास सूरू झाला. मूर्ती असल्याने वाहन अत्यंत संथ गतीने निघाले होते. अवघी ५ची स्पीड असल्याचे या दुःखद प्रवासातून सुखरूप वाचलेले व सध्या रुग्णालयात उपचार घेत असलेले शिवम राऊत यांनी लोकसत्तास सांगितले. गावाजवळ पोहचत असतांनाच १२ चाकी अजस्त्र ट्रक या गाडीला वेगात येऊन धडकला. महामार्गाच्या अगदी एका बाजूला आमचे वाहन जात असतांना आमची काहीच चूक नव्हती. मात्र ट्रक धडकला आणि होत्याचे नव्हते झाले, असे रडवेल्या स्वरात राऊत सांगतो.या दुर्गा मंडळाचे हे ८ वे वर्ष आहे. गत ५ वर्षांपासून ही मंडळी समृद्धी मागार्नेच मूर्ती घेऊन येत असतात. मूर्ती सोबत असल्याने डोळ्यात तेल घालून व दक्ष राहून प्रवास केल्या जातो. यावेळी १४ फूट उंचीची दुगार्माता मूर्ती सोबत होती. सर्व ती काळजी घेऊन कंटाळवाना म्हणता येईल असा हा प्रवास भक्तिमय भावनेत सूरू. पण काळ गावाजवळ येऊन वाट बघत आहे, अशी सूतराम शंका कोणास आली नाही. सर्व २० ते २५ या वयोगटातील व विविध व्यवसाय करणारे. या मंडळाचा उत्सव भव्य मूर्ती व विविध उपक्रम असल्याने शहरात लोकप्रिय म्हटल्या जातो.

---

थोडक्यात

## प्रेमानंद महाराजांच्या शिष्याच्या संशयास्पद मृत्यूचे गूढ वाढले

**जबलपूर** : प्रसिद्ध आध्यात्मिक गुरु प्रेमानंद महाराज यांचे शिष्य रसिक दुलारी शरण उर्फ दीपक लोधी यांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाने आता मोठे वळण घेतले आहे. २५ सप्टेंबर रोजी आश्रमाच्या चौथ्या मजल्यावरून खाली पडून झालेल्या त्यांच्या मृत्यूप्रकरणी पोलिसांनी तपासाचा वेग प्रचंड वाढवला आहे. या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी पोलिसांची ५ विशेष पथके कामाला लागली असून, आतापर्यंत सुमारे ५० हून अधिक लोकांची कसून चौकशी करण्यात आली आहे. मूळचे मध्य प्रदेशमधील जबलपुरचे राहणारे रसिक दुलारी शरण हे आश्रमात राहून साधू सेवा आणि विद्युत संबंधित कामे पाहत होते. २५ सप्टेंबर रोजी ते आश्रमाच्या चौथ्या मजल्यावरून खाली पडल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. त्यानंतर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर परिसरात आणि साधू वर्तुळात एकच खळबळ उडाली. या प्रकरणाचा पदार्फाश करण्यासाठी पोलीस प्रशासनाने सीओ संदीप कुमार यांच्या नेतृत्वाखाली ५ वेगवेगळ्या तपास पथकांची स्थापना केली आहे. ही पथके विविध बाजूंनी प्रकरणाचा तपास करत आहेत. घटनास्थळावरील आणि आसपासचे सीसीटीव्ही फुटेज पिंजून काढण्यात येत आहेत. रसिक दुलारी शरण यांच्या घटनेपूर्वीच्या आणि नंतरच्या प्रत्येक हालचालींवर विशेष तपास होत आहे.

---

# काँग्रेसची आघाडी, विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारांच्या नावाची घोषणा

**नागपूर : अभिजीत वंजारी, अमरावती : आदिती पोहोरे, पुणे : जयंत आसगावकर**



**वृत्तसंस्था, मुंबई**

विधानपरिषदेच्या निवडणुकीला वेग आला आहे. सर्वच राजकीय पक्षांनी हालचाली सुरु केल्या आहेत अशातच या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक मोठी राजकीय बातमी समोर आली आहे. विधान परिषद निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने आपल्या तीन उमेदवारांची यादी जाहीर केली आहे.

नागपूर पदवीधर, अमरावती शिक्षक तर पुणे शिक्षक मतदारसंघाची निवडणूक जाहीर झाली आहे. या निवडणुकीसाठी काँग्रेसकडून उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. नागपूर पदवीधर मतदार संघासाठी अभिजीत वंजारी यांना पुन्हा एकदा उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर दुसरीकडे पुणे मतदारसंघातून जयंत आसगावकर यांना पुन्हा उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर अमरावती शिक्षक मतदार संघामधून अपेक्षेप्रमाणे आदिती पोहोरे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यामुळं आता उमेदवारी कोणाला मिळणार याबाबतच्या चर्चांना पूर्ण विराम मिळाला आहे.

सध्या राज्यात पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. सर्वच राजकीय पक्षांनी हालचाली सुरु केल्या आहेत. सर्वच राजकीय पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात इच्छुकांची संख्या असल्याचे दिसत आहे. यामध्ये आता काँग्रेसने आघाडी घेतल्याचं दिसून येत आहे. आता दुसरे पक्ष कधी उमेदवारांच्या नावाची घोषणा करणार हे पाहणं देखील महत्वाचं ठरणार आहे.

---

# सणासुदित दुष्काळासह महागाई

**वृत्तसंस्था, मुंबई**

देशात सणासुदीचा हंगाम सुरू झाला आहे. या हंगामात किरकोळ बाजारात खरेदी मोठ्या प्रमाणात होते. परंतु किरकोळ बाजारातील वाढत्या महागाईमुळे सामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री बसत आहे. तर उत्पादक मंडळी आणि विविध कंपन्याही घाऊक बाजारातील महागाईमुळे त्रासले आहेत. सणासुदीच्या दिवसात जिथे बाजारात मागणी वाढते आणि खरेदी करणे सामान्यांसाठी गरज बनून जाते अशावेळी वाढत्या महागाईमुळे सामान्यांच्या खिशाला गळती बसत आहे.

जुलै महिन्यात किरकोळ महागाईचा दर ४.४५ टक्के नोंदवण्यात आला होता. ऑगस्ट महिन्यात या दराने ४.८२ टक्क्यांचा आकडा गाठला तर सप्टेंबर मध्ये एसबीआयने ५.६५ अंदाज वर्तविल्यानंतर सप्टेंबरची नोंद ४.८२ इतकी नोंदविण्यात आली आहे. एकंदरीत देशात किरकोळ महागाई वाढली आहे त्यामुळे सामान्य नागरिकांना यंदाचे सण खर्चिक जाणार असल्याचे दिसून येत आहे.घाऊक महागाईत खाद्य वस्तूंची महागाई ७.०५% नोंदवण्यात आली आहे. उत्पादित वस्तूंची महागाई ८.३७% नोंदवण्यात आली आहे. तर इंधन आणि वीज महागाईचा आकडा २२.९३% वर पोहोचला आहे. देशात पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूच्या किमतीने आभाळ गाठले आहे.

याचा मोठा परिणाम उत्पादन क्षेत्रावर होत आहे. त्यामुळे कंपन्यांचे वाहतूक खर्च पूर्णपणे दबावाखाली गेले आहेत. किरकोळ महागाईचा दर ४ टक्क्यांच्या आत ठेवण्याचा भारतीय रिझर्व बँकेचा निर्धार आहे. परंतु गेल्या तीन महिन्यांपासून हा दर ४ टक्क्यांच्या वर राहिला आहे.

उत्पादक मंडळी महागाईने त्रस्त फक्त किरकोळ बाजारात नव्हे तर घाऊक बाजारातही मोठी वाढ दिसून आली आहे. जुलै महिन्यात घाऊक बाजारातील महागाईचा दर ९.७८ टक्के नोंदवण्यात आला होता. ऑगस्ट महिन्यात त्यात वाढ होऊन आकडा ९.९२ टक्क्यांवर पोहोचला आहे. एकंदरीत एकीकडे देशातील उत्पादक मंडळी तसेच कंपन्या घाऊक बाजारात वाढत्या महागाईचा सामना करत आहेत. तर दुसरीकडे सामान्य नागरिक किरकोळ बाजारात वाढत्या महागाईने त्रस्त आहेत.

**अन्न महागाईच्या दरात झाली वाढ**

जुलै महिन्यात किरकोळ अन्न महागाईचा दर ५.५२ टक्के नोंदवण्यात आला होता. ऑगस्ट महिन्यात आकडा ५.९५ टक्के इतका झाला. तर घाऊक बाजारातील महागाईचा दर जुलै महिन्यात ६.६५ टक्के होता. ऑगस्ट महिन्यात यात वाढ होऊन आकडा ७.०५ टक्क्यांवर पोहोचला. एकंदरीत गेल्या महिन्यात अन्न महागाईच्या किरकोळ दरात तसेच घाऊक दरातही वाढ नोंदवण्यात आली. अन्न महागाईच्या दरात वाढ म्हणजे सामान्यांसाठी आवश्यक असणारे भाजीपाला, धान्य, डाळी, दूध, फळे तसेच मसाल्यांसारख्या खाद्य पदार्थांच्या किमतीत वाढ झालेली आहे.

---

# भारताचा सुवर्ण षटकार, बॉक्सिंग, तिरंदाजी, कुस्तीत डंका

## भारताची उत्तुंग झेप, १६ सुवर्ण पदकांसह भारत टॉप फाईव्हमध्ये दाखल, एकूण पदक संख्या ७६ वर

**वृत्तसंस्था, ऐची-नागोया**

आशियाई स्पर्धेत शुक्रवार भारतासाठी गोल्डन डे ठरला. भारतीय क्रीडापटूंनी आज सर्वोत्कृष्ट प्रदर्शन करीत ६ सुवर्ण पदकांसह एकूण १० पदकांची कमाई केली. भारतीय क्रीडापटूंच्या दमदार कामगिरीमुळे ७६ पदकांसह भारत टॉप फाईव्हमध्ये पोहोचला. ३ बॉक्सिंग, १ तिरंदाजी, १ कुस्ती आणि १ महिला हॉकी संघ अशा ६ पदकांची कमाई केली. आजच्या सुवर्ण षटकारामुळे भारताच्या सुवर्ण पदकांची संख्या १६ वर पोहोचली. आज भारताने ६ सुवर्ण, २ कांस्य आणि २ रौप्य पदकांसह १० पदकांची कमाई केली.



जपानमध्ये सुरू असलेल्या २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आपला दबदबा कायम ठेवला. बॉक्सिंगमध्ये भारताच्या सुवर्णमुकुटात आणखी भर पडली. महिलांच्या ७५ किलो वजनी गटात लवलीना बोरगोहेन आणि ६५ किलो वजनी गटात परवीन हुड्डा यांनी सुवर्णपदकावर आपले नाव कोरले तर पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात अंकुश पंघालने सुवर्ण पंच मारत इतिहास रचला. आज भारताने एकट्या बॉक्सिंगमध्येच ३ सुवर्ण पदक पटकावले. परवीन हुड्डाने महिलांच्या ६५ किलो वजनी गटातील अंतिम सामन्यात चिनी तैपेईच्या चेन निएन चिनचा ३-२ असा पराभव केला. परवीन हुड्डा ही आशियाई क्रीडा स्पर्धेत बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक पटकावणारी भारतातील तिसरी महिला बॉक्सर ठरली. तिच्यापूर्वी २०१४ मध्ये दिग्गज मुक्केबाज मेरी कोमने आणि याच चालू स्पर्धेत लवलिना बोरगोहेनने सुवर्णपदक जिंकण्याचा पराक्रम केला. एकाच दिवशी अवघ्या मिनिटाच्या अंतरात लवलिना आणि परवीनने सुवर्ण कमाई केली. यासोबतच कुस्तीत पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात भारताच्या सुजीत कलकलने अप्रतिम कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले. फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धेत त्याने ही सुवर्ण कमाई केली. याशिवाय तिरंदाजी आणि हॉकी स्पर्धेतही भारताने सुवर्ण पदक जिंकले.

यासोबतच सुवर्ण पदक मिळवून देणा-या कुमकुम मोहाडसह धीरज बोम्मदेवरा या तिरंदाजीपटू जोडीने मिक्स्ड टीम रिकर्व्हमध्ये रौप्य पदक आणि धीरज बोम्मदेवरा, नीरज चौहान, यशदीप भोगे या पुरुष तिरंदाजपटूंनीही रौप्य पदक मिळविले. याशिवाय सेलिंग (महिला डिंघी) स्पर्धेत भारताच्या नेत्रा कुमाननने आणि सेपाकतकरा (क्वाड्रेट) च्या भारतीय पुरुष संघानेही कांस्य पदक पटकावले.

### सुवर्ण पदक
- -तिरंदाजी : अंकिता भकत, कुमकुम मोहोडे, कीर्ति शर्मा (महिला टीम रिकर्व्ह)
- -लवलीना बोरगोहेन : बॉक्सिंग (महिला ७५ किलो)
- -परवीन हुड्डा : बॉक्सिंग (महिला ६५ किलो)
- -अंकुश पंघाल : बॉक्सिंग (पुरुष ८० किलो)
- -सुजीत कलकल : कुस्ती (पुरुष ६५ किलो)
- -भारतीय महिला संघ : हॉकी

### रौप्यपदक
कुमकुम मोहोद, धीरज बोम्मदेवरा : तिरंदाजी (मिक्स्ड टीम रिकर्व्ह)
-धीरज बोम्मदेवरा, नीरज चौहान, यशदीप भोगे : तिरंदाजी (पुरुष टीम)

### कांस्य पदक
नेत्रा कुमानन : सेलिंग (महिला डिंघी)
-भारतीय पुरुष संघ : सेपाकतकरा (क्वाड्रेट) - कांस्यपदक

**तिरंदाजीत महिलांची सुवर्णकमाई**

बॉक्सिंग सोबतच तिरंदाजीतही भारतीय महिला संघाने इतिहास रचला. भारतीय महिला तिरंदाजी संघाने दक्षिण कोरियाचे वर्चस्व संपवत आशियाई क्रीडा स्पर्धेत पहिल्यांदाच सुवर्णपदक जिंकण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. तसेच मिक्स्ड रिकर्व्ह संघ आणि पुरुष रिकर्व्ह संघानेही चमकदार कामगिरी करत रौप्यपदक आपल्या नावे केले. रिकर्व्ह तिरंदाजीच्या महिला सांघिक स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकल्यानंतर कुमकुम मोहोडने धीरज बोम्मादेवराच्या साथीने अचूक नेमबाजी साधत भारताला सुवर्ण पटकावून दिले. कुमकुम मोहाडे ही अमरावती जिल्ह्यातील क्रीडापटू आहे.

**भारतीय महिला हॉकी संघाची सुवर्ण भरारी**

भारताच्या महिला हॉकी संघाने २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत इतिहास रचला. अंतिम सामन्यात भारतीय संघाने चीनला १-० ने पराभूत करून सुवर्णपदक पटकावले. यासोबतच भारतीय महिला हॉकी संघाने २०२८ च्या ऑलिम्पिकसाठीही पात्रता मिळवली. १९८२ नंतर प्रथमच भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. भारतीय महिलांनी आशियाई खेळांमधील ४४ वर्षांचा सुवर्णपदकांचा दुष्काळ संपवला.

---

## हिंदी लिहिल्याने २ अधिकारी निलंबित

**चेन्नई** : तमिळनाडू सरकारने शुक्रवारी राष्ट्रीय महामार्गाच्या फलकांवर हिंदी लिहिल्याप्रकरणी दोन सहायक अभियंत्यांना निलंबित केले. हे प्रकरण तुत्तुकुडी जिल्ह्यातील सत्तानकुलम-नाझरेथ राज्य महामागार्शी संबंधित आहे. येथे नव्या फलकांवर तमिळ आणि इंग्रजीसोबतच शहरांची नावे हिंदीतही लिहिण्यात आली होती. तमिळनाडू सरकारच्या मते, हे राज्याच्या द्विभाषिक धोरणाचे उल्लंघन आहे. हिंदी मजकूर हटवण्यासोबतच दोन्ही अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय कारवाई सुरू करण्यात आली आहे. तामिळनाडूमध्ये दीर्घकाळापासून द्विभाषिक सूत्राचे धोरण लागू आहे. याअंतर्गत सरकारी कामकाज आणि शिक्षणात तमिळ व इंग्रजीचा वापर केला जातो. राज्य सरकार हिंदीचा समावेश असलेल्या त्रिभाषिक धोरणाला विरोध करत आले आहे.

संपादकीय लेखणीतून...

# अनुवाद म्हणजे भाषांतर नव्हेच

आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन दरवर्षी ३० सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस जगभरातील अनुवादक, भाषांतरकार आणि भाषाशास्त्रज्ञ यांचा सन्मान करण्यासाठी आणि भाषांतराचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आहे. अनुवादक वेगवेगळ्या भाषांतील साहित्य, ज्ञान आणि विचार यांची देवाणघेवाण सुलभ करतात. ते विविध संस्कृती आणि समुदायांना जोडण्याचे काम करतात, ज्यामुळे जागतिक संवाद, समजूतदारपणा आणि सहकार्य वाढते. या दिवसाचा उद्देश अनुवादाच्या माध्यमातून भाषांतर आणि भाषिक अडथळे दूर करून ज्ञानाचा प्रसार करणे आहे. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापार, कला आणि राजकारण अशा विविध क्षेत्रांत अनुवादकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अनुवादाच्या माध्यमातून लोक एकमेकांच्या भाषा, संस्कृती आणि परंपरांचा आदर करतात आणि जागतिक एकात्मता वाढते. एका भाषेतील मजकूर किंवा अर्थ मूळ आशयाला धक्का न लावता दुसऱ्या भाषेत मांडण्याची प्रक्रिया म्हणजे अनुवाद होय. अनुवादाचे स्वरूप आणि प्रकार पुढीलप्रमाणे आहेत-

अनुवादाचे मुख्य दोन प्रकारः १) शाब्दिक अनुवादः मूळ शब्दांचे थेट भाषांतर केले जाते. उदा. वैज्ञानिक किंवा तांत्रिक लेख. २) अर्थानुवादः मूळ भाषेचा गाभा व भावना जपत दुसऱ्या भाषेत योग्य प्रकारे अर्थ व्यक्त केला जातो. अनुवादाचे महत्त्वः संवाद साधणेः वेगवेगळ्या भाषेतील लोकांशी संपर्क साधणे सोपे होते. ज्ञान समृद्धीः जागतिक साहित्य, विज्ञान आणि तंत्रज्ञान मातृभाषेत उपलब्ध होते. संस्कृतीची देवाणघेवाणः एका संस्कृतीतील विचार दुसऱ्या संस्कृतीपर्यंत पोहोचतात.

आवश्यक कौशल्येः १) भाषिक ज्ञानः मूळ भाषा- स्त्रोतभाषा आणि ज्या भाषेत अनुवाद करायचा आहे ती भाषा- लक्ष्यभाषा, या दोन्हीवर प्रभुत्व. २) सांस्कृतिक संदर्भ - म्हणी, वाक्प्रचार आणि सामाजिक संदर्भ समजण्याची क्षमता. एका भाषेतला मजकूर दुसऱ्या भाषेत, त्या शब्दांतील, वाक्यांतील आणि लिखाणातील भाव, विचार आणि दृष्टिकोन यांच्यासहित नेमकेपणाने व्यक्त करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे अनुवाद होय. अनुवाद म्हणजे भाषांतर नव्हे! बरेचदा भाषांतर आणि अनुवाद यांना एकसारखेच स्थान दिले जाते. मात्र तसे नाही. भाषांतर आणि अनुवाद यांच्यातला फरक खरेतर तसा सूक्ष्म आहे, पण फार मोठ्या अथार्चा अनर्थसुद्धा करू शकतो. भाषांतर करताना मूळ शब्द किंवा वाक्यरचना जशीच्या तशी ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. जसे एका भाषेतील शब्दाला दुसऱ्या भाषेतील शब्द योजने. एकेका शब्दापुरते भाषांतर मर्यादित असल्यास विशेष बाब नाही. मात्र शब्दसमूह अर्थात वाक्यरचनांचे भाषांतर करत असताना, शब्दाला शब्द हा दृष्टिकोन ठेवल्यास मूळ वाक्यांच्या आणि लिखाणाच्या भावाथार्चा ऱ्हास घडून येतो. अनुवादात मूळ लेखनाचे शब्दशः रूपांतर न करता त्यातला मथितार्थ समजून घेणे व सौंदर्यस्थळे जाणून घेऊन ती योग्य रितीने अनुवादात उतरवणे, आवश्यक असते.

अनुवाद आणि शब्दशः भाषांतर यांच्यातील फरक दाखवणारा हा छोटासा नमुना पहा - इंग्रजीत "I Love you" चे शब्दशः भाषांतर मी प्रेम तू असे होते. खरे तर हे भाषांतरही नव्हे, पण नमुन्यादाखल दिले आहे. मात्र अनुवादात "I Love you" चा अनुवाद माझे तुज्यावर प्रेम आहे. असा होतो. खरेतर हे अतिशय साधे उदाहरण आहे, मात्र मोठमोठ्या वाक्यांचे, साहित्य कृतींचे अनुवाद करताना ही बाब दुर्लक्षित केल्यास मोठ्या चुका घडून अनुवादाचा- लिखाणाचा विचका होऊ शकतो. अशा चुका टाळण्यासाठी अनुवादकांना विशेष दक्षता घ्यावी लागते. मूळ लेखक, त्यांचे दृष्टिकोन, लेखनामागचा उद्देश, स्त्रोत भाषा, भाषेची मांडणी, भाषेचे सौंदर्य अशा नानाविध गोष्टी लक्षात घेऊन, त्या वाक्यांचा वरवर लक्षात येणारा अर्थ, त्यांचा लक्ष्यार्थ अर्थात अथार्चा मूळ गाभा, आत्मा जाणून घेऊन जो अनुवाद करू शकतो, तो खरा आणि उत्तम अनुवादक होतो. नवागत अनुवादकांनी हे धोरण लक्षात ठेवूनच अनुवाद केला पाहिजे. सोप्या भाषेत अनुवाद हे भाषांतराचे पुढचे पाऊल म्हणावे लागेल.

अनुवाद प्रक्रियाः अनुवाद प्रक्रियेत ज्या भाषेतला मजकूर दुसऱ्या भाषेत आणायचा असतो, त्या भाषेला मूळ भाषा किंवा उगम भाषा अथवा स्त्रोत भाषा म्हणतात आणि ज्या भाषेत तो मजकूर आणला जातो त्या भाषेला "लक्ष्यभाषा" म्हणतात. चांगल्या अनुवादासाठी अनुवादकाला दोन्ही भाषांची उत्तम जाण असावी लागते. त्याचा दोन्ही भाषांचा सखोल अभ्यास असावा लागतो. त्याचे शब्दज्ञान आणि शब्दसंग्रह परिपूर्ण असावा लागतो. अर्थात हे काम करताना आणि अभ्यासाने हे ज्ञान वाढत जाते.

# शिक्षण क्षेत्रातील वशिलेबाजी आणि भ्रष्टाचाराचे वास्तव: नागपूर जिल्हा परिषद समायोजन गैरप्रकार

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

शिक्षण क्षेत्र हे समाजाचा पाया आणि प्रगतीचे मुख्य साधन मानले जाते. याच क्षेत्रावर देशाचे भविष्य आणि येणाऱ्या पिढीची जडणघडण अवलंबून असते. मात्र, याच पवित्र क्षेत्रात जेव्हा भ्रष्टाचाराची आणि वशिलेबाजीची कीड लागते, तेव्हा संपूर्ण व्यवस्थेवरच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण होते. नागपूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात १ ऑक्टोबर २०२६ रोजी उघडकीस आलेला शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेतील गंभीर गैरप्रकार हा याच दुर्दैवी वास्तवाचा एक भयंकर आणि चिंताजनक पुरावा आहे. आपल्या मर्जीतील शिक्षकांना त्यांच्या सोयीच्या ठिकाणी नियुक्ती देण्यासाठी अधिकाऱ्यांनी ज्या पद्धतीने नियमांची पायमल्ली केली आहे, ती केवळ एक प्रशासकीय चूक नसून शिक्षण व्यवस्थेचा, प्रामाणिक शिक्षकांचा आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा केलेला हा एक मोठा विश्वासघात आहे.

या प्रकरणाच्या मुळाशी गेल्यास प्रशासकीय मनमानीचा आणि ढिसाळपणाचा कळस पाहायला मिळतो. एका शिक्षिकेला तिच्या घराजवळील (सोयीची) शाळा मिळावी यासाठी शिक्षण विभागाने चक्क पुढील शैक्षणिक वर्षाची (२०२७-२८) संचमान्यता गृहीत धरून तिला त्या शाळेत पदस्थापना दिली. मुळात संचमान्यता ही त्या-त्या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष पटसंख्येवर आधारित असते आणि त्यानुसारच शिक्षकांची पदे मंजूर करून अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन केले जाते. परंतु, भविष्यातील काल्पनिक आकडेवारीचा आधार घेऊन आजच बेकायदेशीर नियुक्ती करणे, हे उघडपणे दर्शवते की शिक्षण विभागातील काही अधिकारी स्वतःला सर्व नियमांच्या वरचे समजू लागले आहेत. यावर जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी नीलेश गुंड यांनी दिलेले स्पष्टीकरण - "ही बाब चुकीने घडली असून, या आदेशात सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत" - हे अत्यंत वरवरचे, बेजबाबदार आणि मूळ समस्येवर पांघरूण घालणारे वाटते. ही केवळ एक अनावधानाने झालेली चूक नक्कीच असू शकत नाही, तर हा जाणीवपूर्वक केलेला नियमांचा भंग आहे.

हा प्रकार म्हणजे नागपूर शिक्षण विभागासाठी एखादी वेगळी किंवा अचानक घडलेली घटना नाही. नागपूरचा शिक्षण विभाग आधीच राज्यभरात गाजलेल्या 'शालार्थ आयडी घोटाळ्यामुळे' प्रचंड कुप्रसिद्ध झाला आहे. मान्यता नसतानाही खोटे शालार्थ आयडी तयार करून शिक्षकांचे कोट्यवधी रुपयांचे वेतन काढल्याचा तो मोठा घोटाळा नागपुरातूनच उघडकीस आला होता. त्या प्रकरणात आतापर्यंत २० पेक्षा जास्त वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि संस्थाचालकांना अटक करण्यात आली आहे. अशा एका मोठ्या घोटाळ्याची चौकशी सुरू असतानाच आणि त्यातून कोणताही धडा न घेता, आता जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातील या 'समायोजन गैरप्रकारामुळे' शिक्षण विभागाच्या पारदर्शकतेवर पुन्हा एकदा मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. खोटे आयडी बनवून शासनाची फसवणूक करणाऱ्या या विभागात अजूनही कोणतीही पारदर्शकता आलेली नाही, हेच या ताज्या घटनेवरून स्पष्ट होते.

जेव्हा मर्जीतील आणि वशिला असलेल्या शिक्षकांना राजकीय किंवा आर्थिक दबावापोटी नियम डावलून सोयीच्या बदल्या मिळतात, तेव्हा त्याचे दूरगामी आणि गंभीर परिणाम शिक्षण व्यवस्थेवर होतात.

वर्षानुवर्षे दुर्गम, आदिवासी किंवा नक्षलग्रस्त भागात इमानेइतबारे काम करणाऱ्या आणि नियमानुसार बदल्यांच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो प्रामाणिक शिक्षकांवर हा घोर अन्याय असतो. अशा प्रकारांमुळे तळागाळात, प्रतिकूल परिस्थितीत प्रामाणिकपणे ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांचे मोठे मानसिक खच्चीकरण होते. त्यांच्यातील कामाचा उत्साह मावळतो आणि पर्यायाने त्याचा थेट फटका विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला बसतो. ज्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नैतिकतेचे आणि प्रामाणिकपणाचे धडे द्यायचे असतात, तेच शिक्षक जर भ्रष्ट मार्गाने आपल्या बदल्या करून घेत असतील, तर ते विद्यार्थ्यांना काय आदर्श देणार, हाही एक मोठा प्रश्न उभा राहतो.

शिक्षण विभागात चाललेला हा सावळागोंधळ आता कायमचा थांबवणे ही काळाची अत्यंत महत्त्वाची आणि तातडीची गरज आहे. केवळ जुन्या आदेशात कागदोपत्री दुरुस्ती करून किंवा मलमपट्टी करून या प्रकरणावर पडदा टाकता कामा नये. ज्या अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकारांचा गैरवापर करून या बेकायदेशीर बदल्या केल्या किंवा त्याला मूक संमती दिली, त्यांच्यावर तातडीने आणि कठोर कारवाई (निलंबन किंवा बडतर्फी) व्हायलाच हवी, जेणेकरून इतरांवर वचक बसेल. जोपर्यंत शिक्षण व्यवस्थेतील अशा भ्रष्ट प्रवृत्तींना कायमचे ठेचले जात नाही आणि बदल्यांच्या किंवा समायोजनाच्या प्रक्रियेत १०० टक्के पारदर्शकता आणली जात नाही, तोपर्यंत राज्याच्या शिक्षण व्यवस्थेचे भवितव्य सुरक्षित राहू शकणार नाही. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राचे चाललेले हे बाजारीकरण थांबवण्यासाठी आता शासनाने 'शून्य सहनशीलता' धोरण अवलंबणे अनिवार्य झाले आहे, तरच खऱ्या अर्थाने शिक्षण क्षेत्राचे पावित्र्य राखले जाईल.

- ९५६१५९४३०६

# क्रिकेटच्या व्यवस्थितपणासाठी आयसीसीकडून नव्या नियमांची अंमलबजावणी लागू

डॉ. दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

इंटरनॅशनल क्रिकेट कौन्सील अर्थात आयसीसी संपूर्ण जगतील क्रिकेटवर नियंत्रण ठेवते. जगात कुठेही चाललेले क्रिकेट चाकोरीबद्ध संचलित व्हावे या उद्देशाने आयसीसीने आठ नवे नियम लागू केले आहे. त्या आठही नव्या नियमांचा आढावा आपण घेऊया. जुलै २०२५ मध्ये लॉर्ड्स कसोटीदरम्यान, भारताच्या शुभमन गिलने इंग्लंडच्या झॅक क्रॉलीच्या वेळकाढूपणावर आक्षेप घेतला होता, कारण क्रॉलीवर शेवटच्या षटकासाठी क्रीजवर उशिरा आल्याचा आरोप होता. गुरुवारी, आयसीसीने क्रिकेटच्या नियमांमध्ये ८ बदल केले. आता, जर एखाद्या फलंदाजाने फलंदाजी करताना जाणूनबुजून वेळकाढूपणा केला, तर क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाला ५ दंडात्मक धावा मिळतील.

पुरुष, महिला आणि ज्युनियर क्रिकेटमध्ये वापरल्या जाणाऱ्या चेंडूच्या आकारासाठी आणि वजनासाठी वेगवेगळ्या मयार्दा निश्चित करण्यात आल्या आहेत. हे नवीन नियम १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यानंतर सुरू होणाऱ्या आंतरराष्ट्रीय मालिकांना लागू होतील. आधीच सुरू असलेल्या मालिकांसाठी जुने नियम लागू राहतील.

### १. तिसऱ्या फाऊलसाठी क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाला ५ धावा

आता, फलंदाजाने निर्धारित वेळेत चेंडू खेळण्यासाठी तयार असले पाहिजे. जर पंचांना असे वाटले की फलंदाज वेळेत चेंडू खेळण्यासाठी तयार नाही, तर पहिल्या फाऊलसाठी एक चेतावणी आणि दुसऱ्यासाठी अंतिम चेतावणी दिली जाईल. तिसऱ्या फाऊलसाठी क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाला ५ दंडात्मक धावा दिल्या जातील.

### २. दिवसाच्या कसोटी सामन्यांमध्ये गुलाबी चेंडूची चाचणी

दिवसाच्या कसोटी सामन्यांमध्ये आता गुलाबी चेंडू चाचणी म्हणून वापरला जाऊ शकतो. खेळावर अपुऱ्या प्रकाशाचा होणारा परिणाम कमी करणे हा यामागील उद्देश आहे.

कसोटी सामना सुरू होण्यापूर्वी दोन्ही संघांची संमती आवश्यक असेल. एकदा गुलाबी चेंडूने खेळण्याचा निर्णय झाल्यावर, सामन्यादरम्यान चेंडू बदलता येणार नाही. सध्या, गुलाबी चेंडू फक्त दिवस-रात्र कसोटी सामन्यांमध्ये वापरला जातो.

आंतरराष्ट्रीय कसोटी सामन्यांमध्ये गुलाबी चेंडूचा पहिला वापर २०१५ मध्ये ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड यांच्यातील दिवस-रात्र कसोटी सामन्यात झाला होता.

### ३. पुरुष आणि महिला क्रिकेटसाठी चेंडू वेगळा असेल

पुरुष आणि महिला क्रिकेटसाठी चेंडूचा आकार आणि वजनाची मयार्दा वेगवेगळी असेल. पुरुषांच्या चेंडूचे वजन १५६ ते १६३ ग्रॅम आणि लांबी २२.४ ते २२.९ सेंटीमीटर असेल. महिलांच्या चेंडूचे वजन १४२ ते १४९ ग्रॅम आणि लांबी २१.५ ते २२ सेंटीमीटर असेल.

### ४. ओव्हरथ्रो नियमातील बदल

जर एखाद्या क्षेत्ररक्षकाने धाव रोखण्यासाठी किंवा धावबाद करण्यासाठी मुद्दाम चेंडू यष्टींच्या दिशेने फेकला आणि चेंडू यष्टींच्या पलीकडे गेला, तर तो ओव्हरथ्रो मानला जाईल. तथापि, चेंडू थांबवण्याचा किंवा दुसऱ्या क्षेत्ररक्षकाकडे पास करण्याचा प्रयत्न करताना झालेली क्षेत्ररक्षणातील चूक ओव्हरथ्रो मानली जाणार नाही.

### ५. धावबाद आणि यष्टीरक्षणासाठी चेंडूवर पूर्ण नियंत्रण आवश्यक

धावबाद किंवा यष्टीरक्षणाच्या बाबतीत, केवळ हाताने किंवा ग्लोव्हने चेंडूला स्पर्श करणे यापुढे पुरेसे ठरणार नाही. क्षेत्ररक्षक किंवा यष्टीरक्षकाचे चेंडूवर पूर्ण नियंत्रण असणे आवश्यक आहे.

उदाहरणार्थ, जर यष्टीरक्षकाने केवळ हाताने चेंडूला स्पर्श केला आणि त्याच वेळी बेल्स पडल्या, तर ते चेंडूवरील पूर्ण नियंत्रण मानले जाणार नाही. अशा परिस्थितीत, केवळ चेंडूला स्पर्श करणे बाद करण्यासाठी पुरेसे ठरणार नाही.

### ६. शेवटच्या षटकात विकेट पडल्यास दिवसाचा खेळ आपोआप संपणार नाही

कसोटी क्रिकेटमध्ये, दिवसाच्या शेवटच्या षटकात विकेट पडल्यास आता सामना आपोआप संपणार नाही. जर शेवटचे षटक पूर्ण झाले नसेल आणि हवामान व मैदानाची परिस्थिती खेळासाठी अनुकूल असेल, तर उरलेले चेंडू दुसऱ्या दिवशी न टाकता त्याच दिवशी टाकले जातील.

समजा दिवसाच्या शेवटच्या षटकात तीन चेंडू शिल्लक आहेत आणि विकेट पडली, तर अनुकूल परिस्थितीत दोन चेंडू टाकले जातील. पूर्वी, अशा परिस्थितीत दिवसाचा खेळ संपवला जात असे. आयसीसीच्या मते, यामुळे वेळेची बचत होते. कसोटी सामन्यांमध्ये, पहिल्या दिवसाच्या शेवटच्या षटकात विकेट पडल्यास सामने थांबवले जात असत. चित्रात लॉर्ड्सवर इंग्लंड आणि श्रीलंका यांच्यात खेळला गेलेला सामना दाखवला आहे.

### ७. आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १५ मिनिटांचा मध्यांतर, ड्रिंक्स ब्रेक दरम्यान प्रशिक्षक मैदानावर

टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये आता १५ मिनिटांचा निश्चित मध्यांतर असेल. सामन्यात आधीच वेळ निघून गेली असल्यास, हा मध्यांतर १० मिनिटांपर्यंत कमी केला जाऊ शकतो. एकदिवसीय आणि टी-२० सामन्यांमध्ये, ड्रिंक्स ब्रेक दरम्यान मुख्य प्रशिक्षक मैदानावर येऊ शकतात. एकदिवसीय सामन्यांमध्ये, सध्या ड्रिंक्स ब्रेक दरम्यान फक्त बदली खेळाडूंनाच मैदानात प्रवेश करण्याची परवानगी आहे.

### ८. लेग-साइड वाईडसाठी फलंदाजाची स्थिती विचारात घेतली जाईल

लेग-साइड वाईड संदर्भातील नियम आता एकदिवसीय आणि टी-२० सामन्यांमध्ये लागू करण्यात आला आहे. हा नियम अशा परिस्थितीत लागू होतो, जिथे फलंदाज चेंडू टाकण्यापूर्वी किंवा चेंडू टाकताना आपली स्थिती बदलतो. आता चेंडू टाकताना फलंदाजाच्या पायांची स्थिती विचारात घेतली जाईल. जर फलंदाज चेंडू टाकल्यानंतर ऑफ-साइडला गेला, तर त्याची त्यानंतरची हालचाल वाईडसाठी विचारात घेतली जाणार नाही.

- ९०९६३७२०८२

# मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह!

रमेश लांजेवार
नागपूर

भारतात लोकशाही आहे त्या पध्दतीने संविधानाच्या माध्यमातून संपूर्ण नियमावली तयार करण्यात आली आहे त्यानुसार देश व देशाचा कारभार चालतो.परंतू यात जर कोणी चुका करीत असेल तर त्याच्या कठोर कारवाई झालीच पाहिजे.परंतु ज्ञानेश कुमार सारखे मुख्य निवडणूक आयुक्त यात ढवळाढवळ करून पदाचा दुरुपयोग करीत असेल तर त्यांना संविधानिक पदावर रहाण्याचा तिळमात्र अधिकार नाही. कारण भारतातील निवडणूक प्रक्रिया देश घडविते व त्यातून देशाचे सूत्रसंचालक चालत असते.परंतु ज्यावेळेस तीन निवडणुक आयुक्त असतात तेव्हा सवार्णूमते निर्णय ग्राह्य धरण्यात येतो.परंतु जेव्हा तिन्ही निवडणूक अधिकाऱ्यांमध्ये खटकते आणि ज्ञानेश कुमार सारखे निवडणूक आयुक्त दोन आयुक्तांच्या सुचना किंवा निर्णय ऐकत नाही किंवा धाब्यावर ठेवतात तेव्हा लक्षात येते की, ज्ञानेश कुमार सारखे आयुक्त मनमानी करीत असावेत. याच माध्यमातून ज्ञानेश कुमार यांनी एसआयआर प्रक्रियेत मोठा घोळ केला असुन निवडणूक प्रक्रियेत मोठी ढवळाढवळ केल्याचे चित्र देशापुढे स्पष्ट दिसत आहे.

त्यामुळेच सर्वत्र आक्रोशाचे वातावरण पहायला मिळत आहे. आज संपूर्ण विरोधी पक्ष व सर्वसामान्य नागरिक ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाईची व निलंबनाची मागणी करीत आहे यावरून स्पष्ट होते की, ज्ञानेश कुमार यांनी मोठा घोळ केला असावा.कारण ज्ञानेश कुमार यांनी एसआयआर प्रक्रियेत मोठा घोळ करत देशातील अंदाजे १३ करोड मतदारांचे नाव कापले यात २ करोड ८० मृत्यू मतदार सांगितले जाते व बाकी १० करोड २० लाख मतदारांचे काय यावर ज्ञानेश कुमार यांनी चुप्पी साधल्याने संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत आणि त्यातूनच ज्ञानेश कुमार यांच्यावर चौतर्फा हल्ला सुरू झाला व आता ही बाब स्पष्ट झाली आहे की मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सरकारच्या सांगण्यावरूनच एसआयआर च्या माध्यमातून १० करोड २० लाख मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळण्यात आले.त्यामुळे यावर सरकार ज्ञानेश कुमार यांच्यावर सरळ कारवाई करण्यास हिचकिचावतांना दिसत आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, निवडणूक आयोगातील इतर दोन निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी नोव्हेंबर २०२५ ते ऑगस्ट २०२६ या काळात 'विशेष सखोल पुनरीक्षण' (एस आय आर ) प्रक्रियेसह विविध निर्णयांवर किमान १४ वेळा लेखी आक्षेप व असहमती नोंदवली होती.परंतू मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी इतर आयुक्तांना विश्वासात न घेता किंवा त्यांच्या सल्ल्याविरुद्ध जाऊन फॉर्म ६ मधील बदल आणि मतदार यादी डेटाच्या केंद्रीकरणासारखे निर्णय एकतर्फी घेतल्याचा आरोप त्यांच्यावर आहेत. या एकतर्फी निर्णयामुळे देशभरात सुमारे १० करोड ८० लाख मतदार मतदार यादीतून वगळले गेल्याचा आणि पात्र मतदारांवर गदा आल्याचा दावा करण्यात आला आहे.

यावरून स्पष्ट होते की, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार व सरकारमधील काही राजकीय पुढारी निवडणूक प्रक्रियेत अवश्य ढवळाढवळ करून घोळ करीत असावेत.२०२३ च्या कायद्यात निवडणूक आयुक्तांनी निर्णय शक्यतो एकमताने घ्यावेत,अशी तरतूद आहे. एकमत न झाल्यास बहुमताचा निर्णय अंतिम मानला जाईल. मुख्य निवडणूक आयुक्त एकतर्फी निर्णय घेत होते आणि त्यातून लाखो मतदारांची नावे अधिकृतपणे वगळली किंवा नव्याने समाविष्ट केली जात होती, हे नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका बातमीने समोर आल्याने देशात आक्रोश निर्माण झाला आहे. यावरून स्पष्ट होते ज्ञानेश कुमार अवश्य दोषी असावेत.त्यांनी केलेल्या चुका प्रेस कॉन्फरन्सच्या माध्यमातून ताबडतोब मिडिया समोर येऊन सांगाव्यात किंवा ताबडतोब आपल्या पदाचा राजीनामा द्यावा यासाठी सर्वच स्तरातून देशभरात मोठ्या प्रमाणात आंदोलनाला सुरुवात झाली आहे.सध्याच्या परिस्थितीत एस आय आर पध्दतीनेमध्ये भयंकर घोळ सुरू असल्याचे दिसून येते काहिंना जन्म दाखला मागत आहे, काहिंना आईची माहिती,वडिलांची,आजोबांची अशा अनेक प्रकारच्या नवीन-नवीन बाबी एस आय आर प्रक्रियेत निर्माण झाल्याने अनेकांना याबाबत नोटीस बजावली आहे यामुळे देशाचा सर्वसामान्य नागरिक सुद्धा व्दिधेत असल्याचे दिसून येते.

एसआयआरमध्ये मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी आधारकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅनकार्ड, इलेक्शन कार्ड, इलेक्ट्रॉनिक बिल किंवा कोणताही आयडी प्रूफ गृहीत धरून एस आय आर प्रक्रिया सहज पूर्ण करता येते. परंतु सध्या एसआयआरमध्ये ज्ञानेशकुमार यांची मनमानी दिसून येत असून संविधानिक पदाचा गैरवापर करतांना दिसतात. ज्ञानेशकुमार यांच्या कथीत घोळ प्रकरणात सरकारने अधिकृतरित्या उत्तर द्यावे सत्ताधारी राजकीय पक्षांनी किंवा पुढाऱ्यांनी यात ढवळाढवळ करू नये व राजकारण करण्याचा प्रयत्न करू नये.निवडणूक प्रक्रियेबद्दल सरकारला किंवा निवडणूक आयोगाला प्रश्न विचारण्याचा संपूर्ण अधिकार सर्वसामान्य जनतेला व विरोधकांना आहे याची जाणीव सरकारने ठेवावी. त्यामुळे त्यांच्या प्रश्नाचे उत्तर कायद्याच्या माध्यमातून सरकारने द्यायला पाहिजे.




मृत व दुबार असलेल्यांची नावे वगळणे योग्य आहे याला कोणाचाही विरोध नाही आणि नसावा. परंतू रेगूलर मतदारांची आणि विशिष्ट लोकांची नावे काही कारण नसताना वगळणे योग्य नाही. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात याचिका दाखल करण्यात आली आहे व दाखल केलेली याचिका ऐकण्यास सर्वोच्च न्यायालयाने सहमती दर्शवली आहे. यात ज्ञानेश कुमार यांनी इतर दोन निवडणूक आयुक्तांच्या मंजुरी शिवाय भारतीय निवडणूक आयोगाच्या नावाने अनेक निर्णय घेतले असा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. यावर सर्वोच्च न्यायालयात पुढील आठवड्यात सुनावणी होण्याची शक्यता आहे.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेत भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण आडवाणी, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि निवडणूक आयुक्त एस. एस. संधू यांच्यासह अनेक प्रमुख मतदारांच्या नोंदींमध्ये विसंगती आढळल्याने त्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.म्हणजे आतापर्यंत ज्या नेत्यांनी अनेक दशके मतदान केले त्यांच्या मतदारांच्या नोंदीमध्ये विसंगती येत असेल तर देशाच्या करोडो नागरिकांचे काय? याचे उत्तर ज्ञानेश कुमार यांनी प्रथम द्यायला हवे. तीन मुख्य निवडणूक आयुक्त असतांना फक्त स्वतःचा निर्णय ग्राह्य धरने म्हणजे ज्ञानेश कुमार यांची मनमानीच म्हणावी. त्यामुळे आता ज्ञानेश कुमार यांची सखोल चौकशी करून योग्य निर्णय घेण्याची वेळ आली. कारण ज्ञानेश कुमार यांच्या अनेक चुकीच्या निर्णयामुळे निवडणूक आयोगाच्या एसआयआर प्रक्रियेवर आणि निवडून प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# ज्येष्ठ हेच भारतीय संस्कृतीचे खरे वाहक व संरक्षक : सुधाकर कोहळे

## जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ज्येष्ठांचा सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
भारतीय संस्कृतीतील चांगले संस्कार, प्रेमळ वागणूक, राष्ट्रभक्ती आणि समाजसेवेची परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम ज्येष्ठ नागरिक करीत असतात. त्यामुळे ज्येष्ठ हेच भारतीय संस्कृतीचे खरे वाहक व संरक्षक आहेत, असे प्रतिपादन माजी आमदार सुधाकर कोहळे यांनी केले.

ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भाच्यावतीने आयोजित जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन २०२६ कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. महामंडळाचे सचिव अशोक भुताड यांनी प्रास्ताविकातून ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित मागण्या मांडल्या. ज्येष्ठांचे अनेक प्रश्न संघटित शक्तीच्या माध्यमातून सोडविता येऊ शकतात, असे सांगत त्यांनी सर्व ज्येष्ठ नागरिकांना संघटित होण्याचे आवाहन केले.

प्रा. प्रभुजी देशपांडे यांनी महामंडळाच्या 'राष्ट्र के हित में समाज, समाज के हित में ज्येष्ठ और ज्येष्ठ के हित में परिवार' या ब्रीदवाक्यामागील भूमिका स्पष्ट केली. परिवार, समाज आणि राष्ट्र अधिक सक्षम करण्याची जबाबदारी ज्येष्ठ नागरिकांची असल्याचे त्यांनी सांगितले.

महामंडळाचे अध्यक्ष अविनाश तेलंग यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, गरजा आणि प्रलंबित मागण्यांवर प्रकाश टाकला आणि नागपुरात ज्येष्ठ नागरिकांच्या व्याधींवर संशोधन करण्यासाठी जेरियाट्रिक रिसर्च इन्स्टिट्यूट स्थापन करण्याची मागणी त्यांनी केली.



यावेळी श्री नारायण समर्थ, मंगला समर्थ, व्रजराज कपाटे, डॉ. पुष्पा तायडे, डॉ. रवींद्र बोथरा आणि प्रा. विजया मारोतकर यांचा मान्यवरांच्या हस्ते हृद्य सत्कार करण्यात आला.

यावेळी नेत्रदानाचा संकल्प करून दृष्टीहीन व्यक्तींना जग पाहण्याची संधी देणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना प्रमाणपत्र देऊन प्रमुख अतिथींच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

मुख्य कार्यक्रमापूर्वी नंदकिशोर मुळे व सहकाऱ्यांचा 'गीतगुंजन' हा संगीतमय कार्यक्रम झाला. सदाबहार गीतांच्या सादरीकरणाने श्रोते मंत्रमुग्ध झाले. यावेळी प्रमुख अतिथींच्या हस्ते नंदकिशोर मुळे यांचाही सत्कार करण्यात आला. डॉ. अरविंद शेंडे यांनी आभार मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे नेटके व प्रभावी संचालन डॉ. मीनल सांगोळे यांनी केले. कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## नागपूर परिमंडळात महावितरणचा सर्जिकल स्ट्राईक!

### १.१९ कोटीच्या ९५८ वीज चोऱ्या उघडकीस

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
वीज चोरांचे धाबे दणाणत महावितरणच्या नागपूर परिमंडळाने अनधिकृत वीज वापरकर्त्यांविरोधात जोरदार सर्जिकल स्ट्राईक केला आहे. सप्टेंबर २०२६ या एकाच महिन्यात नागपूर शहर, नागपूर ग्रामीण आणि वर्धा या तिन्ही मंडलांत धडक धाडी टाकून तब्बल ९५८ वीज चोऱ्यांचा पर्दाफाश करण्यात आला. या धडक मोहिमेमुळे चोरीची वीज वापरणाऱ्यांचे पितळ पुरते उघडे पडले आहे.

महावितरणच्या वीज चोरी विरोधी तपासणी पथकांनी संपूर्ण ताकदीने राबवलेल्या या मोहिमेत ९५८ पैकी ९०१ ग्राहकांचा काळाबाजार उघडकीस आणत १ कोटी १९ लाख ४० हजार रुपयांच्या बिल व दंडाचा दणका देण्यात आला. महावितरणच्या आक्रमक पाठपुराव्यापुढे वीज चोरांना झुकावे लागले असून, अवघ्या काही दिवसांत ४८६ ग्राहकांकडून ६५ लाख ७० हजार रुपयांची रक्कम वसूल करण्यात आली आहे. या कारवाईत तब्बल ५ लाख ५१ हजार युनिट्सची वीज चोरी निष्पन्न झाली असून त्यापैकी ३ लाख ७ हजार युनिट्सच्या दंडात्मक रकमेची वसुली पूर्ण झाली आहे.

नागपूर शहर मंडळात ३८७ वीज चोऱ्यांवर वीज चोरांवर सर्वाधिक हल्लाबोल झाला. यापैकी ३७२ ग्राहकांचे ५५ लाख ९० हजार रुपयांचे उल्लंघन पकडले गेले असून १५३ ग्राहकांकडून २१ लाख ४० हजार रुपयांची वसुली झाली. यामध्ये महाल विभागात १०३, सिव्हिल लाईन्समध्ये ८८, गांधीबागमध्ये ७३, बुटीबोरीमध्ये 66 आणि काँग्रेस नगर विभागात ५७ वीज चोरांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. तर दुसरीकडे नागपूर ग्रामीण मंडळातही ३७४ प्रकरणे उघडकीस आली त्यापैकी ३४२ ग्राहकांना ४६ लाख ९० हजार रुपयांचे बिल ठोकण्यात आले, ज्यापैकी २१३ ग्राहकांकडून ३१ लाख २० हजार रुपये वसूल करण्यात आले. मौदा विभागात सर्वाधिक १३० चोऱ्या पकडल्या गेल्या, तर उमरेडमध्ये ९०, सावनेरमध्ये ८८ आणि काटोलमध्ये ६६ प्रकरणांवर कडक कारवाई करण्यात आली. दुसरीकडे, यापुर्वी १ एप्रिल ते ३० सप्टेंबर २०२६ या सहा महिन्याच्या काळात परिमंडळात २ कोटी रुअप्ये मुल्याच्या तब्बल १५९४ वीज चोऱ्या उघडकीस आल्या होत्या, त्यात ग्रामिण मंडळात ५८८, शहर मंडळात ४७१ तर वर्धा मंडळातील ५३५ वीज चोऱ्यांचा समावेश आहे. तसेच वर्धा मंडळातही महावितरणने धडक मोहीम राबवून १९७ प्रकरणे उघडकीस आणली. यापैकी १८७ ग्राहकांना १६ लाख ६० हजार रुपयांचे बिल दिले गेले, ज्यापैकी १२० ग्राहकांकडून १३ लाख २० हजार रुपये वसूल झाले.

यामध्ये वर्धा विभागात ७४, हिंगणघाटमध्ये ७१ आणि आर्वी विभागात ५२ प्रकरणे उघडकीस आली. कारवाईदरम्यान ३५१ ग्राहकांनी तडजोड शुल्क (कंपाऊंडिंग चार्जेस) भरून सुटका करून घेतली असली, तरी वीज चोरी करून अरेरावी करणाऱ्या आणि सहकार्य न करणाऱ्या ३ वीज चोरांवर पोलीस ठाण्यात थेट गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये गांधीबाग विभागात २ आणि सावनेर विभागात १ गुन्हा नोंदवला गेला आहे. प्रामाणिक ग्राहकांच्या हक्कावर दरोडा घालणाऱ्या आणि वीज यंत्रणेचे नुकसान करणाऱ्या वीज चोरांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. महावितरणची ही धडक मोहीम यापुढे अधिक तीव्र होणार असून चोरीची वीज वापरणाऱ्यांचे धाबे दणाणणार आहेत, असा इशारा देत महावितरण प्रशासनाने सर्वांना अधिकृत वीज जोडणी घेण्याचे अंतिम आवाहन केले आहे.

## दो दिवसीय 'ASID २०२६' सम्मेलन का उद्घाटन आज

### केंद्रीय मंत्री नितिन गडकरी रहेंगे उपस्थित

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर :** एशिया में बुनियादी ढांचे के विकास की दिशा, आधुनिक तकनीक और सतत विकास के उपायों पर मंथन के लिए इंडियन कंक्रीट इंस्टीट्यूट (आईसीआई), नागपुर सेंटर की ओर से 'एशियन सिनारियो ऑन इंफ्रास्ट्रक्चरल डेवलपमेंटअंतरराष्ट्रीय सम्मेलन का आयोजन ३ व ४ अक्टूबर को किया जा रहा है। वर्धा रोड स्थित रैडिसन ब्लू होटल में आयोजित इस सम्मेलन का उद्घाटन ३ अक्टूबर को सुबह ११ बजे केंद्रीय सड़क परिवहन एवं राजमार्ग मंत्री नितिन गडकरी की प्रमुख उपस्थिति में होगा।

सम्मेलन में देश-विदेश के जाने-माने इंजीनियर, शोधकर्ता, शिक्षाविद और इंफ्रास्ट्रक्चर क्षेत्र के विशेषज्ञ हिस्सा लेंगे। आईसीआई के राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. वी. रामचंद्र, महासचिव इंजि. राधाकृष्णन, आईसीआई के पूर्व अध्यक्ष प्रो. महेश टंडन, सीबीआरआई के निदेशक डॉ. प्रदीप रामनचाराला, एनआईटी श्रीनगर के निदेशक प्रो. अनुराग मिश्रा, स्ट्रक्चरल इंजीनियर्स वर्ल्ड कांग्रेस (इंडिया) के अध्यक्ष डॉ. मनमोहन आर. कालगल, सिका के निदेशक इंजीनियर निलोतपोल कार, आईआईटी मद्रास के प्रो. मनु संथानम, सिडनी के डॉ. स्टीफन फॉस्टर, टीएआई के उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मण राव सहित प्रो. के. वी. एल. सुब्रमणियम, इंजि. फ्लोरियन क्रेन, डॉ. वू येन लेई, जोस कुरियन और सेंथीकुमार गणपति सहित कई राष्ट्रीय एवं अंतरराष्ट्रीय विशेषज्ञ मार्गदर्शन देंगे। सम्मेलन के दौरान आयोजित तकनीकी प्रदर्शनी में विभिन्न संस्थाओं और उद्योग क्षेत्र की कंपनियों की ओर से आधुनिक निर्माण सामग्री, तकनीक, उपकरण, सेवाओं और नवाचार आधारित समाधानों के स्टॉल लगाए जाएंगे। ASID 2026 में प्रस्तुत किए जाने वाले गुणवत्तापूर्ण शोधपत्रों में से चयनित शोधपत्रों को अरउए के विशेषांक के जर्नल में प्रकाशित किया जाएगा। सम्मेलन के संयोजक इंजि. मनोज कावलकर, डॉ. एच. डी. चांदेवार तथा आईसीआई नागपुर सेंटर के चेयरमैन डॉ. स्वप्नील साटोणे हैं।

## जैन कलार समाजातर्फे उद्या भव्य महाआरोग्य शिबिर

### हृदयापासून डोळ्यांपर्यंत विविध तपासण्या नि:शुल्क; औषधे, चष्मे आणि आयुष्मान कार्डबाबत मार्गदर्शन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे, विविध आजारांचे वेळीच निदान करणे आणि सर्वसामान्यांना मोफत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सामाजिक बांधिलकीतून प्रयास जैन कलार ज्येष्ठ नागरिक मंडळ आणि जैन कलार समाज मध्यवर्ती मंडळ (केंद्रीय व जिल्हा समिती) यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या ४ ऑक्टोबर रोजी (रविवारी) सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत रेशिमबाग, उमरेड रोड येथील जैन कलार समाजाच्या सभागृहात हे शिबिर होणार आहे.

श्रावण रामटेककर आणि देवकाबाई रामटेककर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत बदललेला आहार, वाढता मानसिक ताण आणि व्यायामाचा अभाव यामुळे विविध आजारांचे प्रमाण वाढत आहे. अनेकदा आजाराची लक्षणे दिसूनही वेळेवर तपासणी होत नसल्याने आरोग्याच्या समस्या गंभीर होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन समाजातील ज्येष्ठ नागरिकांसह सर्व वयोगटांतील नागरिकांना आरोग्य तपासणीची संधी उपलब्ध करून देण्याचा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे.

तज्ज्ञ डॉक्टरांकडून विविध आजारांची तपासणी या महाआरोग्य शिबिरात विविध वैद्यकीय क्षेत्रांतील तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली तपासण्या करण्यात येणार आहेत.

हृदयरोग, कर्करोग, यकृतरोग, छाती व श्वसनविकार, त्वचारोग, अस्थिरोग तसेच नाक, कान आणि घशाच्या आजारांची तपासणी केली जाणार आहे. याशिवाय ईसीजी, रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबीन आणि डोळ्यांची तपासणी पूर्णपणे निःशुल्क करण्यात येणार आहे. विविध तपासण्यांमुळे नागरिकांना आपल्या आरोग्याविषयी प्राथमिक माहिती मिळण्यास मदत होणार असून, आवश्यकते नुसार पुढील उपचारांसाठी योग्य मार्गदर्शनही मिळू शकणार आहे. मोफत औषधे, चष्मे आणि शासकीय योजनांची माहिती आरोग्य तपासणी बरोबरच गरजू रुग्णांना मोफत औषधांचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच आवश्यकते नुसार चष्म्यांचेही निःशुल्क वितरण केले जाणार आहे. यामुळे आर्थिक अडचणींमुळे आरोग्य सुविधांपासून दूर राहणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळण्यास मदत होईल.

शिबिरात शासकीय विभागाच्या माध्यमातून आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आयुष्मान कार्डविषयी माहिती देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया आणि उपलब्ध आरोग्य सुविधांबाबत नागरिकांना मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यामुळे आरोग्य तपासणीसोबतच शासकीय आरोग्य योजनांची माहिती मिळवण्याची संधीही नागरिकांना उपलब्ध होणार आहे. सामाजिक बांधिलकीतून आरोग्यसेवेचा उपक्रम जैन कलार समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम केवळ वैद्यकीय तपासणी पुरता मर्यादित नसून, समाजात आरोग्या विषयी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण ठरणार आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना एकाच ठिकाणी विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमातून प्रयत्न करण्यात येत आहे.

या महाआरोग्य शिबिराचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रयास जैन कलार ज्येष्ठ नागरिक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष किरणजी गोसेवाडे, अध्यक्ष प्रकाश मासुरकर, सचिव विजय समर्थ आणि प्रायोजक त्रिलोक रामटेककर यांनी केले आहे. शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यासाठी मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि विश्वस्त नियोजन, व्यवस्थापन तसेच श्रमदानाच्या माध्यमातून परिश्रम घेत आहेत.

## शिक्षकांनी आपल्या गायन कलेने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नुकताच पार पडलेला टीचर्स म्युझिकल सिंगर्स ग्रुपतर्फे आयोजीत दिनांक २६ आणि २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वा. शिक्षक दिनाचे औचित्य साधून विदर्भस्तरीय टीचर गायक आणि गायिकांना एकत्र करून दोन दिवसीय संगीतमय कार्यक्रम सीताबर्डी, नागपूर येथील अर्पण सभागृहात प्रमोदजी अंधारे यांच्याद्वारे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रमुख अथिती म्हणून पदवीधर नागपूर विभागाचे आमदार अभिजीत वंजारी व प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर अडबाले तसेच मुख्य उपस्थिती वृंदाताई



विकास ठाकरे आणि ग्रुपचे कार्याध्यक्ष डॉ. धनंजय वेळूकर या सर्वांनी आपली उपस्थित दर्शविली.

असे सांगितिक कार्यक्रम नेहमी व्हावे आणि शिक्षक-शिक्षिका गायकांना रोजच्या धावपळीच्या दगदगीतून मोकळा श्वास घेण्यास मदत मिळावी आणि आपला छंद जोपासावे याकरिता हे व्यासपीठ अत्यंत गरजेचे आहे. करिता या कार्यक्रमासाठी अभिजीत वंजारी, सुधाकरजी अडबाले, सौ. वृंदाताई विकास ठाकरे यांनी आर्थिक मदत करण्याचे कबूल केले. असे कार्यक्रम विदर्भ स्तरावर प्रत्येक जिल्ह्यात व्हावेत अशी आशा पाहुण्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे उत्तम संचालन डॉ. विनोद बालकोटे, प्रा. प्रिया खटोले, रिना पुरी तसेच डॉ. नितू गुप्ता यांनी केले. या विदर्भस्तरीय दोन दिवस



झालेल्या संगीतमय कार्यक्रमात अनेक शिक्षक- शिक्षिका गायकांनी आपली प्रस्तुती दिली. साऊंड सिस्टीम प्रवीणजी भिवगडे व टेक्नीकल जबाबदारी माधव लोखंडे यांनी सांभाळली.

गायकांमध्ये टीचर्स ग्रुपचे अध्यक्ष प्रा. प्रमोद अंधारे यांनी 'अरे यार मेरी तुम भी हो गजब' हे गाणं गाऊन प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. व सचिव प्राचार्य राजू देशपांडे यांचे राजू चल राजू' हे गाणं विशेष ठरले. तसेच गायकांमध्ये मार्गदर्शक सुनिल भुसे, हेमलता सलामे, डॉ. अरविंद काळे, अश्फाक शेख, भारती लोखंडे, श्याम डहाके, डॉ. दत्तात्रेय वझरकर, नितीन भोळे, प्रा. प्रकाश डहाके, राजेश धुंदाड, डॉ. सुशील गडेकर, राजेंद्र नांदुरकर, डॉ. संदिप सराटकर, डॉ. सुनिल भगत, विरेंद्र गुंफावार, विजया वैद्य, साधना पोहरे, प्रा. खुशाली कोडापे, सविता रेलकर, पूजा पदम, लीला पवार, कविता बागडे, रंजना देशपांडे, संध्या फुके, संगिता आरेकर, सुरेखा यादव, सरीता मिझार्पुरे, प्रतिभा केंद्रे, वंदना जनबंधू, कुमुदिनी राघोर्ते, वर्षा वनकर, संध्या वैद्य, कादंबरी राऊत वैशाली प्रयागी सविता गुंजेवार, मिनल ताजनेकर, जयंत गुजर, दिलीप बन्नोटे, प्रशांत मरसकोल्हे, दिलीप एलकुंचवार, दीपक सातपुते, संदिप जावळे, अरविंद पांडे, शंकर बहादुरे, आशिष महाजन, राजेश गवळी, अशोक तुरक्याल, सच्चिदानंद दारुंडे इत्यादिंनी सहभाग घेतला होता.

**थोडक्यात**

### दहेगाव येथे पीएम श्री शाळा व ग्रामपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने सेवासंकल्प अंतर्गत स्वच्छता अभियान उत्साहात संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**
पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, दहेगाव व गट ग्रामपंचायत, दहेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा पंधरवडा अंतर्गत 'सेवासंकल्प अभियान' निमित्त भव्य स्वच्छता अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानात शाळेच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी गावातील मुख्य रस्ते, शाळा परिसर व सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करून स्वच्छतेचा संदेश दिला. या कार्यक्रमाला सरपंचा भारती आंबीलढुके, उपसरपंच रविंद्र ढोमणे, तंटामुक्ती अध्यक्ष भगवान आंबिलढुके, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितेश इंगळे, धानला केंद्राचे केंद्रप्रमुख राजू आंबीलकर उपस्थित होते.

पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दहेगावचे मुख्याध्यापक वासुदेव भुते यांच्या नेतृत्वात शिक्षकवृंद पुष्पा आंबीलढुके, अश्विनी तलमले, दिवाकर देशमुख, प्रीती हटवार, नेहा आंबीलढुके, भगवान हटवार, राजेश रोहाड, सुधीर खंडाईत, सुधीर कांबळे, सुजाता बोधले, प्रज्ञा रामटेके, संगीता आंबीलढुके,ज्योती आंबीलढुके, पुष्पलता उके, उमेश उके यांनी स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा उत्साह व ग्रामस्थांचा सहभाग हे या अभियानाचे वैशिष्ट्य ठरले. "स्वच्छ दहेगाव - सुंदर दहेगाव" चा नारा यावेळी देण्यात आला.

### ग्रामपंचायत कार्यालय चाचेर येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची संयुक्त जयंती



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**
आज शुक्रवार (ता. २ ऑक्टोबर) ला ग्रामपंचायत कार्यालय, चाचेर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची संयुक्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी सरपंचा लुंबिनी महेश कलारे, ग्रामपंचायत पदाधिकारी व समस्त ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी त्यांनी केलेल्या महान कार्यावर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य शैलेश कोपरकार, सुरेंद्र टेंभरे, चंद्रकला धोटे, ग्रामपंचायत लिपिक चंद्रशेखर देवगडे,रामानंद खडसे, उत्तम पाटील, गुणरत्न हुमणे, अमरदीप अडकणे, आकाश राऊत, आरोग्य सेविका इंदू किटे, अंगणवाडी सेविका पुष्पा बिसने, रंजना नगरे, वैशाली श्रोते, शीतल बावनकुळे, विमल हुमणे, आशा वर्कर इंदू बागडे, प्रतिभा हुमणे, सीमा पेठे,सविता बावणे तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक अरुण काळे, राजू महादूले आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वाडी न.प.कार्यालयात म. गांधी व लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**
वाडी नगर परिषद कार्यालयात महात्मा गांधीजी व माजी प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. वाडी नगर परिषद कार्यालयात महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेस उपनगराध्यक्ष कल्पना सगदेव यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले.'स्वच्छता ही सेवा' मोहीम अंतर्गत उपस्थिताना स्वच्छतेची सामूहिक शपथ देण्यात आली.यावेळी विरोधी पक्ष नेता श्याम मंडपे, पाणी पुरवठा सभापती विजय मेंढे,सभापती ज्योती भोरकर, नगरसेवक आनंद कदम,सविता ईसळ,नेहा तिरपुडे,आशिष पाटील,सुनीता मेश्राम,शितल नंदांगवळी,संगीता बावणे, लीला रहांगडाले यांच्या सह कार्यालयीन अधिकारी दिनेश बुधे, अमेय मेटांगळे, प्रणय गायधने, अभिजीत येडवे प्रामुख्याने उपस्थित होते.

### 'खिलते हैं गुल यहाँ...' हिंदी-मराठी गीतांचा कार्यक्रम आज

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
स्वरकमल संगीत अकॅडमीतर्फे 'खिलते हैं गुल यहाँ...' या विशेष हिंदी-मराठी सदाबहार गीतांचा कार्यक्रम शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक हॉलमध्ये आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात अरुंधती मांडवगणे, कल्पना कुणावार, विभा चौहान, दिपाली पनके, शिल्पा खानझोडे, डॉ. प्राची पातुरकर, सीमा सोनुले, प्राची दाणी, स्मिता बेंद्रे, रेणू कुंभारे, अंजली महा आणि आरती बकाल या गायिका हिंदी व मराठी लोकप्रिय गीतांचा नजराणा सादर करतील.

या कार्यक्रमाची संकल्पना स्वरकमलच्या संचालिका डॉ. मंजिरी अय्यर यांची असून, संगीत संयोजन महेंद्र ढोले यांनी केले आहे. निवेदन सोनाली बिरेवार करतील. या निःशुल्क कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

थोडक्यात

## सूरज येवले यांची काँग्रेसच्या प्रदेश सचिवपदी नियुक्ती, नागपुरात सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीमध्ये अनुसूचित जाती विभागाच्या प्रदेश सचिवपदी मा. सूरज भाऊ येवले यांची नियुक्ती झाल्याबद्दल काँग्रेस पार्टी, नागपूरच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. पक्षाने दिलेली नवी जबाबदारी ही त्यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याची दखल असल्याची भावना यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. सत्कार समारंभात काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सूरज येवले यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. तसेच त्यांच्या पुढील संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

अनुसूचित जाती समाजातील विविध प्रश्न, सामाजिक न्याय, शिक्षण, रोजगार तसेच वंचित घटकांच्या हक्कांसाठी पक्षाच्या माध्यमातून प्रभावीपणे काम करण्याची अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. प्रदेश सचिवपदाची जबाबदारी मिळाल्या नंतर सूरज येवले यांनी पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी तसेच समाजातील विविध घटकांशी संपर्क वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला. काँग्रेसच्या विचारधारेनुसार सामाजिक समता आणि सर्वसमावेशक विकासासाठी कार्य करण्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी काँग्रेसचे पदाधिकारी, विविध सेलचे प्रतिनिधी, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी सूरज येवले यांच्या नियुक्तीचे स्वागत करून त्यांना पुढील कायार्साठी शुभेच्छा दिल्या.

## जवाहर विद्यार्थी गृहात नगरसेविका शीलाताई तराळे यांचा सत्कार

### तेली समाजाच्यावतीने सामाजिक व सार्वजनिक कार्याची दखल

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जवाहर विद्यार्थी गृह, तेली समाज, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात काँग्रेस पक्षाच्या नगरसेविका शीलाताई दिनेश तराळे यांचा सत्कार करण्यात आला. सामाजिक, सार्वजनिक तसेच नागरिकांच्या विविध प्रश्नांसाठी केलेल्या कार्याची दखल घेत



त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी जवाहर विद्यार्थी गृहातील पदाधिकारी, तेली समाजाचे ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या निमित्ताने समाजातील विविध प्रश्न, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित, सामाजिक उपक्रम तसेच परिसरातील नागरी समस्यांवरही चर्चा करण्यात आली. सत्काराला उत्तर देताना शीलाताई दिनेश तराळे यांनी समाजाने व्यक्त केलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याची ग्वाही त्यांनी दिली. समाजाच्या विकासासाठी शिक्षण, संघटन आणि सामाजिक सहभागाला अधिक बळ देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. जवाहर विद्यार्थी गृहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य सुरू आहे. अशा उपक्रमांमुळे समाजातील विविध घटकांमध्ये संवाद व एकोपा वाढण्यास मदत होत असल्याचे उपस्थितांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवर, पदाधिकारी आणि समाजबांधवांनी शीलाताई तराळे यांना पुढील सामाजिक व सार्वजनिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## नबीरा महाविद्यालय, काटोल येथे एनसीसी विभागातर्फे स्वच्छता अभियान



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त नबीरा महाविद्यालय, काटोल येथील एनसीसी विभागाच्या वतीने स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. या स्वच्छता मोहिमेत महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्सनी उत्स्फूर्तपणे व सक्रिय सहभाग नोंदविला. या अभियानादरम्यान एनसीसी कॅडेट्सनी महाविद्यालयाचा परिसर तसेच आजूबाजूचा परिसर स्वच्छ केला. यासोबतच स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जबाबदारी याबाबत जनजागृती करण्यात आली. 'स्वच्छ भारत, हरित भारत' हा संदेश देत विद्यार्थ्यांनी स्वच्छ व निरोगी समाजाच्या निर्मितीसाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यावे, असे आवाहन केले.

विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची जाणीव निर्माण करणे, पर्यावरणाबद्दल संवेदनशीलता वाढविणे आणि सामाजिक जबाबदारीची भावना दृढ करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. या स्वच्छता अभियानात एनसीसी अधिकारी प्रा. डॉ. अभिजीत देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. नवीन, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. परेश देशमुख, पर्यवेक्षिका प्रा. श्रद्धा चांडक, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि एनसीसी कॅडेट्स यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. महाविद्यालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून 'स्वच्छता हीच सेवा' आणि 'स्वच्छ परिसर, निरोगी जीवन' हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. एनसीसी कॅडेट्सच्या या उपक्रमातून शिस्त, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रसेवेची भावना अधोरेखित झाली.

# कवी कालिदास आयटीआयमध्ये कायमस्वरूपी पाणीपुरवठा

### मनिष खोब्रागडे (तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी) यांच्या पाठपुराव्याला यश

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

वाहिटोला येथील कवी कालिदास औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे गेल्या अनेक वर्षांपासून पिण्याचे पाणी तसेच शौचालयासाठी आवश्यक असलेल्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था नसल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येची अखेर दखल घेण्यात आली असून संस्थेला कायमस्वरूपी पाणी कनेक्शन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या संस्थेत सुमारे ३५० विद्यार्थी व विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. ग्रामपंचायतीमार्फत पाणीपुरवठा केला जात असला तरी कमी दाबामुळे वर्षातील काही महिन्यांतच पाणीपुरवठा सुरळीत होत होता. उर्वरित काळात पाण्याअभावी विद्यार्थ्यांना तसेच संस्थेच्या प्रशासनाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते.




या समस्येबाबत काही विद्यार्थ्यांनी मनीष खोब्रागडे यांच्याकडे तक्रार केली होती. त्यानंतर खोब्रागडे यांनी स्वतः संस्थेत जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली व विद्यार्थ्यांच्या समस्यांची माहिती घेतली. पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी त्यांनी संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला.

या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून, मा. ना.श्रीमती.सुमित्राताई पवार उपमुख्यमंत्री महाराष्ट्र यांच्या मार्गदर्शनातून तसेच मा. राजा भाऊ टाकसाळे नागपूर ग्रामीण जिल्हा अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांच्या प्रयत्नातून कवी कालिदास औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला कायमस्वरूपी पाणी कनेक्शन उपलब्ध करून देण्याची कार्यवाही पूर्णत्वास आली आहे.

कायमस्वरूपी पाणीपुरवठ्या मुळे संस्थेतील सुमारे ३५० विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या पिण्याच्या पाण्याचा तसेच शौचालयासाठी लागणाऱ्या पाण्याचा प्रश्न आता सुटणार आहे.

या संपूर्ण प्रक्रियेत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राध्यापक आर्या वाळके सर यांचेही मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या मूलभूत सुविधेचा प्रश्न मार्गी लागल्याने विद्यार्थी व संस्थेच्या वतीने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## गांधी-शास्त्री जयंतीनिमित्त स्वच्छता, श्रमदान अन् वृक्षारोपण

### राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचा समाजोपयोगी उपक्रम, महापुरुषांच्या विचारांना कृतीची जोड




**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

नूतन आदर्श कला, वाणिज्य व श्रीमती म. ह. वेगड विज्ञान महाविद्यालय, उमरेड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती विविध समाजोपयोगी उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहीम, श्रमदान आणि वृक्षारोपण करून सामाजिक बांधिलकी व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या राष्ट्रसेवेतील योगदानाचे स्मरण करून त्यांच्या विचारांना उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. दिनकर तायवाडे होते. सामाजिक कार्यकर्त्या सुरेखा मेश्राम आणि इतिहास विभागप्रमुख प्रा. मनोजकुमार नगरकर यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. यावेळी सुरेखा मेश्राम यांनी महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा, स्वच्छता आणि सामाजिक समतेच्या विचारांचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाला डॉ. सोबल जॉर्ज, डॉ. लोमेश बावनकुळे, डॉ. हरिहर दहिकर आणि डॉ. चंद्रहास नंदनवार यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रुपेश खुबाळकर यांनी केले. धनश्री फड्डास यांनी सूत्रसंचालन केले, तर सानिका महाकाळकर यांनी आभार मानले.

## राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना वाडी शहर कांग्रेस कमेटीच्यातर्फे विनम्र अभिवादन

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी :** आज राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना राष्ट्रपिता महात्मा गांधी चौक वाड़ी इथे मल्यार्पण करून अभिवादन करण्यात आला. येथे प्रामुख्याने उपस्थित माजी सरपंच बेबी धबाले,प्रमिला पवार माजी सभापति,प्रेम झाडे माजी नगराध्यक्ष,पंकज फलके प्रवक्ते



जिल्हा युवक कांग्रेस,आशिष पाटील नगरसेवक,किशोर नागपुरकर,संजय जीवनकर,श्रीकांत ढोने,अरुणा पगाडे अध्यक्ष वाडी शहर महिला काँग्रेस,रीना चिमनकर,भीमराव कांबळे,गणेश बावणे,पंडित भोरगडे,चंद्रशेखर येवले,हिम्मत गाडेकर,आशीष झा,नितिन कोहपरे,गोकुळ जुमनाके, अतुल देरकर, अमोल केदार,नीता मडावी,अनुप रामटेके,अभिनव वड्डेवार,विनोद बारंगे,अतुल खाडे,सचिन डूमब्रे,सौरभ नाईक,रोशन रागीट,पवन अटकड़,आशिष रामटेके,अनिल गायकवाड,समीर रामटेके,सागर बैस,मयूर कडे,अनिकेत तितरमारे, सुदर्शन टिसके,शुभम हाडके व सर्व काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

## गांधी जयंती निमित्त वाडी विकास संघर्ष आघाडीतर्फे राष्ट्रपित्यांना अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

सत्य, अहिंसेच्या बळावर भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने वाडी विकास संघर्ष आघाडीने माल्यार्पन करून अभिवादन केले.वाडीतील नागपूर-अमरावती महामार्गा वरील काटोल वळणावरील महात्मा गांधी चौकातील राष्ट्रपित्याच्या तैल चित्राला जयंती निमित्य पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितानी महात्मा गांधी की जय, जब तक सुरज चांद रहेगा - बापू तेरा नाम रहेगा च्या घोषनांनी परिसर दुमदुमून टाकला. अभिवादन कार्यक्रमाला वाडी विकास संघर्ष आघाडीचे अध्यक्ष प्रकाश कोकाटे, कार्याध्यक्ष मधु माणके पाटील सह चंद्रशेखर येवले, अमीत हुसनापुरे, अशोक गडलिंगे सचिव दिपक ठाकरे, माजी सरपंच भीमराव लोखंडे, अमित तायडे, शरद इंगळे, जेम्स फ्रांसिस, संदिप रायजादा, दांडेकर गुरुजी, शिवम राजे, रवींद्र सुरजुसे, राजेंद्र पवार, जगदिश लिचडे, बंडू चौधरी, रमेश विलोनकर, संविधानिक अधिकार पार्टीचे राजा मणी राय, मनोज कुंभरे, दिलीप इरपाते, विलास कांबळे, राजेश उईके, विक्रम धुर्वे इत्यादी कार्यकर्त्यांनी राष्ट्रपित्यांना अभिवादन केले.

## चोरट्यांचा दुकान फोडण्याचा प्रयत्न सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद; व्यापाऱ्यांची पोलिसांकडे धाव

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

अमरावती रोडवरील मारुती नगर व्यावसायिक परिसरात शुक्रवारी पहाटे तीन अज्ञात इसमांनी सुगंधा मोबाईलसह अन्य दुकानांमध्ये चोरी करण्याचा प्रयत्न केला. मात्र नागरिकांची हालचाल सुरू झाल्याने चोरट्यांचा प्रयत्न फसला आणि ते मोटारसायकलवरून पसार झाले.



या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज तसेच संशयितांचा आवाज रेकॉर्ड झाला असून, त्यांच्याकडे रॉड, कटर आदी साहित्य असल्याचे दिसून येते. याप्रकरणी व्यापारी व नागरिकांनी वाडी पोलीस ठाण्यात सामूहिक निवेदन देऊन फुटेजच्या आधारे संशयितांचा शोध घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

दरम्यान, मागील महिन्यात याच परिसरातील Axis Bank ATM फोडण्याचा प्रयत्न झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये सुरक्षेबाबत चिंता वाढली आहे. मारुती नगर व अमरावती रोड परिसरात रात्रीची पोलीस गस्त वाढवावी, अशीही मागणी करण्यात आली. पोलीस निरीक्षक नितीन मगर यांनी घटनेची दखल घेत योग्य कारवाईचे आश्वासन दिले.

यावेळी शैलेश थोराने, राजेश थोराने, स्वप्नील थोराने, रुपेश गुहे, संदेश साठे, नितीन थोराने, दिलीप गोडेकर यांच्यासह व्यापारी व नागरिक उपस्थित होते.

# डॉ. कोठेकर यांची कविता चिंतनशीलतेतून जन्माला आलेली : प्रमोद बापट

### डॉ. उपेंद्र कोठेकर यांच्या निवडक कवितांचा संग्रह 'मौनाच्या पारावर'चे थाटात प्रकाशन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेला कार्यकर्ता हा समाजातील घडामोडींबाबत अधिक संवेदनशील असतो. समाजाकडे पाहण्याची त्याची दृष्टी आणि संवेदनशीलता व्यापक असावी लागते. ही चिंतनशीलता त्याला कवितेकडे घेऊन जाते आणि कोठेकर यांची कविता याच चिंतनशीलतेतून जन्माला आली आहे, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे क्षेत्रीय प्रचार प्रमुख प्रमोद बापट यांनी व्यक्त केले.

भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र उपाध्यक्ष व कवी डॉ. उपेंद्र मा. कोठेकर यांच्या निवडक कवितांचा संग्रह ह्यमौनाच्या पारावरह्ण चे प्रकाशन शुक्रवारी हॉटेल अशोका येथे थाटात झाले. लेखक, वक्ता व




समीक्षक डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी हे पुस्तक संपादित केले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे होते तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे क्षेत्रीय प्रचार प्रमुख प्रमोद बापट उपस्थित होते. डॉ. उपेंद्र मा. कोठेकर, डॉ. राजेंद्र नाईकवाडे, लाखे प्रकाशनचे चंद्रकांत लाखे, डॉ. मनिषा कोठेकर यांची मंचावर उपस्थिती होती.

प्रमोद बापट म्हणाले, मौन ही मोठ्या बोलण्याला जन्म देणारी अवस्था आहे. ज्याला समाजाला काही मोलाचे सांगायचे असते, त्याची साधना मौनातच होत असते. उपेंद्र कोठेकर यांच्यासारखा समाजात सतत वावरणारा आणि सामाजिक घडामोडींमध्ये सक्रिय असलेला कार्यकर्ता जेव्हा 'मौनाच्या पारावर' व्यक्त होतो, तेव्हा ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे.

वाढदिवसानिमित्त कोठेकर यांना शुभेच्छा देताना बापट म्हणाले की, कोठेकर हे केवळ कविता लिहिणारे नाहीत, तर कवितेतून व्यक्त होणाऱ्या सामाजिक जाणिवांवर प्रत्यक्ष कृती करणारे कार्यकर्ते आहेत.

डॉ. राजेंद्र नाईकवाडे पुस्तकावर भाष्य करताना म्हणाले की, 'मौनाच्या पारावर' या काव्यसंग्रहात भावकविता, सामाजिक कविता, प्रार्थना-चिंतनपर कविता तसेच प्रचारकी कवितेचा समावेश आहे. उपेंद्र कोठेकर हे संवेदनशील कवी असून वैदर्भीय कवितेतील राजकीय जाणिवेच्या प्रवाहात त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे.

कोठेकर यांच्या कवितांवर विविध कवींच्या लेखनाचा प्रभाव जाणवत असला, तरी त्यांची कविता स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. गंभीर जाणिवेतून ते कवितेकडे पाहतात, असे ते म्हणाले.

डॉ. उपेंद्र कोठेकर यांनी, 'कधी चांदण्यात लाभे' या आपल्याच कवितेच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या. लाखे प्रकाशनचे चंद्रकांत लाखे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभा साठे यांनी केले. विनय मोडक यांनी निवडक कवितांचे वाचन केले. आभार डॉ. स्वाती मोहरीर यांनी मानले. शशांक साठे यांनी पसायदान सादर केले.

**मनाला भावणारी कविता - अरुण म्हात्रे**

अध्यक्षीय भाषणात अरुण म्हात्रे यांनी विविध कवींच्या कवितांचा आधार घेत खुसखुशीत भाषण केले. कोठेकर यांच्या काही कविता त्यांनी गाऊन दाखवल्या. ते म्हणाले, उपेंद्र कोठेकर हे मोठे कवी असून, त्यांच्या कवितेचा कल वेल्हाळ आणि मनाला भावणारा आहे. राजकारणात सक्रिय असले तरी त्यांचा पिंड कवीचा आहे. मौनाच्या पारावार त्यांना जे अनुभव येत असतील, त्यातूनच ते कविता लिहित असावेत. त्यांच्या कवितांमध्ये आध्यात्मिक सूर जाणवतो. साधे, सोपे पण खोलवर अर्थ असलेल्या कोठेकर यांच्या कवितांनी आकाश उजळले आहे, असे ते म्हणाले.

यावेळी राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, महापौर नीता ठाकरे, आमदार कृष्णा खोपडे, आमदार संजय भेंडे, प्रा. अनिल सोले, गिरीश व्यास, डॉ. वि. स. जोग, प्रकाश एदलाबादकर, श्याम माधव धोंड, गोविंदप्रसाद उपाध्याय, सुधीर पाठक, नितीन केळकर, सुनील शिनखेडे, जयंत पाठक, विनय माहूरकर, अतुल पांडे, आशुतोष शेवाळकर, सीए मिलिंद कानडे, जयप्रकाश गुप्ता यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

थोडक्यात

## महात्मा गांधी जयंतीनिमित्त भारत निर्माण आंदोलनातर्फे अभिवादन

### चितारओळी येथे माल्यार्पण; सत्य, अहिंसा आणि सामाजिक एकतेचा संदेश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त भारत निर्माण आंदोलनाच्या वतीने २ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता इतवारीतील चितारओळी येथे माळ्यार्पणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. डॉ. गौतमजी मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नागपूर शहर संघटक संतोष भुजाडे यांच्या आयोजनातून हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. गांधीजींच्या सत्य, अहिंसा, शांतता, बंधुता आणि सामाजिक समतेच्या विचारांचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेत समाजात एकता, सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. महात्मा गांधी यांनी सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने देशाच्या स्वातंत्र्यलढ्याला दिशा दिली.

त्यांचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी असून, राष्ट्रनिमार्णासाठी सामाजिक एकता, समानता आणि शांततेचे महत्त्व या कार्यक्रमातून अधोरेखित करण्यात आले. या कार्यक्रमाला योगेश ज्ञानेश्वर धोटे पाटील, दक्षिण विधानसभा संयोजक; भारत ठाकरे, पूर्व विधानसभा संघटक; तुषार ढोबळे; आशिष खुबळकर; कुलवंत सिंग भामरा; मनोज जरेल यांच्यासह भारत निर्माण आंदोलनाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमातून त्यांच्या विचारांचा जागर करीत समाजात सकारात्मक परिवर्तन आणि राष्ट्रनिमार्णासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचा संदेश देण्यात आला.

## स्वच्छता ही सेवा अभियानातून आमगावात स्वच्छतेचा जागर

### नगर परिषदेकडून विविध सार्वजनिक ठिकाणी विशेष स्वच्छता व श्रमदान, स्वच्छता कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी व सुरक्षा साहित्याचे वाटप




**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त २ ऑक्टोबर २०२६ रोजी नगर परिषद आमगावच्यावतीने स्वच्छता ही सेवा अभियान राबविण्यात आले. स्वच्छतेमध्ये सहभाग - स्वच्छ भारत, विकसित भारत या संदेशातून शहरातील विविध सार्वजनिक व शासकीय ठिकाणी विशेष स्वच्छता व श्रमदान करण्यात आले. या अभियानांतर्गत गांधी चौक, नगर परिषद परिसर व मैदान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक तसेच अन्य सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. नगर परिषद अधिकारी, कर्मचारी आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांनी अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत परिसर स्वच्छ केला. यावेळी उपस्थित अधिकारी, कर्मचारी व स्वच्छता कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेची शपथ घेत स्वच्छ, सुंदर आणि निरोगी आमगाव घडविण्याचा संकल्प केला.

स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेत त्यांच्या आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. तसेच कामाच्या ठिकाणी सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांना PPE व सुरक्षा साहित्याचे वाटप करण्यात आले. स्वच्छता ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित मोहीम नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांनीही नियमितपणे स्वच्छता राखत नगर परिषदेला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. जनसहभागातून स्वच्छ आमगाव, सुंदर आमगाव आणि निरोगी आमगाव घडविण्याचा संदेश या अभियानातून देण्यात आला.

## केळवद येथे ८० वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू, जटामखोरा बिडगाव रस्त्यावरील घटना

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

तालुक्यातील केळवद येथे शेतात गेलेल्या ८० वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना आज सकाळी सुमारे ९.३० वाजताच्या दरम्यान घडली. मृतक सुखदेव रामाजी पिसे (वय ८०), रा.



केळवद, हे शेती व्यवसाय करीत होते. मिळालेल्या माहितीनुसार, ते सकाळी सुमारे ७.३० वाजता स्वतःच्या गाडीने शेतात गेले होते. शेतातून परत येत असताना ते शेताच्या रस्त्यावर पडलेल्या अवस्थेत आढळून आले. प्राथमिक माहितीनुसार, त्यांच्यावर त्यांची गाडी पडल्याचे समोर आले आहे. मात्र, या घटनेत नेमके काय घडले आणि मृत्यूचे कारण काय आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच केळवद पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकूर यांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना माहिती दिली. त्यानंतर हितेश बनसोड यांच्या मदतीने सुखदेव पिसे यांना सावनेर शासकीय रुग्णालयात आणण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. मृतदेह शवविच्छेदनासाठी रवाना करण्यात आला असून, शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. या घटनेचा पुढील तपास केळवद पोलीस करीत आहेत.

# शंखनाद न्यूज चॅनेलतर्फे विदर्भस्तरीय पाककला स्पर्धा उत्साहात

### कर्करोग योद्धा शेफ नीता अंजनकर ४ ऑक्टोबरला करणार जागतिक विक्रम, तसेच पाककला स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शंखनाद न्यूज चॅनेलतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही विदर्भस्तरीय पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यंदाच्या उपक्रमाला सामाजिक बांधिलकीची जोड देण्यात आली असून, कर्करोग योद्धा शेफ नीता अंजनकर यांच्या माध्यमातून पारंपरिक भारतीय खाद्यपदार्थ मोठ्या प्रमाणात तयार करून जागतिक विक्रम प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. शुक्रवारी महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाबाबत जनजागृती करण्यासाठी मॅमोग्राफी तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.

या विविध उपक्रमांचा शुभारंभ २ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता धनवटे नॅशनल कॉलेज, कॉंग्रेसनगर, नागपूर येथे पार पडला. यावेळी विदर्भस्तरीय पाककला स्पर्धा तसेच मॅमोग्राफी तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

४ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता कर्करोग योद्धा शेफ नीता अंजनकर यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात पारंपरिक भारतीय खाद्यपदार्थ तयार करून जागतिक विक्रमाचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यानंतर सकाळी ११ वाजता विदर्भस्तरीय पाककला स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात येणार असून, जागतिक विक्रमाच्या प्रयत्नाबद्दल शेफ नीता अंजनकर यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

**मॅमोग्राफी तपासणी शिबिर**

शंखनाद न्यूज चॅनेलच्या पुढाकाराने भानुताई गडकरी डायग्नोस्टिक सेंटर, लायन्स क्लब ऑफ नागपूर आणि धनवटे नॅशनल कॉलेजच्या जनसंपर्क/मास कम्युनिकेशन विभागाच्या सहकार्याने मॅमोग्राफी तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले

महिलांच्या आरोग्याविषयी जनजागृती आणि स्तनाच्या कर्करोगाचे वेळेवर निदान व्हावे, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन शेफ नीता अंजनकर, नागपूर आणि शंखनाद न्यूज चॅनेल, नागपूर यांच्यावतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे ठिकाण धनवटे नॅशनल कॉलेज, अजनी रेल्वे स्थानकासमोर, कॉंग्रेसनगर, नागपूर असे आहे.

यावेळी पाककला स्पर्धेच्या व मॅमोग्राफी तपासणी शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी गिरीश व्यास यांच्यासह शंखनाद न्युजचे संचालक सुनील कुहीकर यांची उपस्थिती होती.

## विद्यासागर कला महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**



विद्यासागर कला महाविद्यालय खैरी,बिजेवाडा,रामटेक येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागआणि सांस्कृतिक कार्यक्रम विभागातर्फे २ ऑक्टोंबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती संयुक्तपणे साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून विद्यासागर कला विद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश सोमकुवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि स्व. लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख डॉ. रवींद्र पानतावणे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील डॉ.सावन धर्मपुरिवार,डॉ. गिरीश सपाटे, डॉ. ज्योती कवठे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी डॉ. सतीश महल्ले, डॉ. आशीष ठाणेकर, विलास जायभाये, प्रा. गंगा मोंढे, प्रा. रणजीत वायसे, कीर्ति जयस्वाल, युनूस पठाण, ज्ञानेश्वर हटवार, विनोद परतेती, रफिक कुरेशी, ललित कनोजे आणि सर्व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

## "सुदृढ बालक, निरोगी समाजासाठी राष्ट्रीय पोषण माह निमित्त ग्राम आमगाव खुर्द अंगणवाडीत एस. आर.बी. महिला महाविद्यालयाचा उपक्रम



**दै. सिंहवाणी वृतत, राजु फुंडे-सालेकसा :** सालेकसा येथील एस.आर.बी. महिला महाविद्यालयाच्या वतीने सुभाष चौक आमगाव खुर्द अंगणवाडी येथे राष्ट्रीय पोषण माह कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. राजेंद्रजी बडोले होते, तर उद्घाटन संस्थेच्या अध्यक्षा शालिनीताई बडोले यांच्या हस्ते झाले.यावेळी मार्गदर्शक म्हणून मा. ज्योती बागडे अंगणवाडी सेविका आमगाव खुर्द, प्रमुख अतिथी मा. वंशिका फरकुंडे मदतनीस आमगाव खुर्द , मा. अरुणाबाई गायकवाड जेष्ठ नागरिक, मा. मोहिनी हेमने जेष्ठ नागरिक, मा. डॉ. एस.सी.बिसेन विभागप्रमुख, गरोदर महिला, स्तनदा माता, लहान मुले तसेच गावातील महिला मोठ्या संख्येने प्रामुख्याने उपस्थितीत होते. कार्यक्रमाची सुरुवात स्त्रीशिक्षणाच्या जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर गृहविज्ञान विभागाच्या विद्यार्थिनींनी पोषण आहार विषयांवर प्रभावी नुक्कड नाटक सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमस्थळी चार्ट, पोस्टर, विविध कडधान्ये वापरून केलेली रांगोळी तसेच विविध पौष्टिक पाककृतींच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय पोषण माहाच्या माध्यमातून बालकांचे आरोग्य, संतुलित आहार, पोषणाचे महत्त्व तसेच निरोगी जीवन शैलीबाबत जनजागृती करण्यावर भर देण्यात आला. अंगणवाडीतील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषण आहाराचे महत्त्व ज्योती बागडे यांनी समजावून सांगितले, तसेच निरोगी बालपण हीच सुदृढ समाजाची पायाभरणी असून, पोषणाबाबतची जागरूकता प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे असे अध्यक्षीय भाषणातून डॉ. राजेंद्र बडोले यांनी सांगितले तर शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी दैनंदिन जीवनात संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांचे महत्त्व स्पष्ट करून बदलत्या जीवनशैलीमध्ये पोषणयुक्त आहाराचा समावेश करणे आवश्यक असल्याचे मा. शालिनी ताई यांनी सांगितले. अंगणवाडीच्या माध्यमातून बालकांच्या आरोग्य व पोषणाकडे विशेष लक्ष दिले जात असून, अशा जनजागृतीपर उपक्रमांमुळे पालक आणि समाजामध्ये पोषणाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होते. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अंगणवाडीतील लहान मुलांना फळे व बिस्किटांचे वाटप करून त्यांच्यासोबत आनंदाचे क्षण साजरे केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गृहविज्ञान विभागाच्या विभागप्रमुख डॉ. सरस्वती बिसेन यांनी केले. संचालन प्रा. नीता धकाते यांनी केले,तर उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा. वैद्य यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. एकुलकर, पायल पाथोडे ,अमित कोटांगले, सुजित कोटांगले, साहिल परिहार, यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी आणि येथील ग्रामस्थांनी सहकार्य केले.

# वन्यजीव वाचले तरच निसर्ग अन् मानवाचे भविष्य सुरक्षित

### वनविभागाचा स्तुत्य उपक्रम : आमगाव वनपरिक्षेत्र अधिकारी शेषराज आकरे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, मानव-वन्यजीव सहअस्तित्वाचा दिला प्रेरणादायी संदेश

### बिरसी जि.प. शाळेत वन्यजीव सप्ताहानिमित्त जनजागृती कार्यक्रम संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**



वन्यजीवांचे संरक्षण, संवर्धन आणि जैवविविधतेचे अनन्यसाधारण महत्त्व विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनात रुजविण्याच्या उदात्त उद्देशाने 'जागतिक वन्यजीव सप्ताहा'चे औचित्य साधून बिरसी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विशेष जनजागृतीपर कार्यक्रमाचे थाटात आयोजन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थितांना वन्यजीव अन् निसर्ग संवर्धनाबाबत सविस्तर व मार्गदर्शनपर विचार मांडण्यात आले.

सदर कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून आमगावचे वनपरिक्षेत्र अधिकारी शेषराज आकरे, आमगावच्या वनपाल दुर्गा अगडे, वनपाल बेनीमाधव हत्तीमारे यांच्यासह वनरक्षक कर्मचारी, 'शीघ्र कृती दल' व वनमजूर प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच बिरसी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक-शिक्षिका आणि विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या उपक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वनपरिक्षेत्र अधिकारी शेषराज आकरे यांनी वन्यजीवांचे निसर्गातील स्थान, त्यांचे रक्षण, जंगलांचे संवर्धन आणि मानव-वन्यजीव सहअस्तित्व यावर सविस्तर प्रकाश टाकला. "वन्यप्राण्यांची बेकायदेशीर शिकार थांबवणे, त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे रक्षण करणे, जैवविविधता जपणे तसेच वनसंपदेचे संवर्धन करणे ही केवळ वनविभागाचीच नव्हे, तर समाजातील प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे," असे प्रतिपादन त्यांनी केले.

वन्यजीवांचे संरक्षण करणे म्हणजे प्रत्यक्ष निसर्गाचा समतोल राखणे होय. वन्यजीव वाचले तरच निसर्ग आणि मानवाचे भविष्य सुरक्षित राहील, असा मोलाचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. उपस्थित विद्यार्थ्यांनी वन्यजीव आणि पर्यावरण संवर्धनाचा हा विचार केवळ ऐकून न सोडता, आपल्या दैनंदिन वर्तनातून समाजापर्यंत पोहोचविण्याचा दृढ संकल्प केला.

वनविभागाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीवांविषयी प्रेम, संवेदनशीलता आणि पर्यावरण संरक्षणाची तीव्र जाणीव निर्माण झाली आहे. वनविभागाने राबविलेल्या या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमाचे सर्व उपस्थितांनी व ग्रामस्थांनी मुक्तकंठाने कौतुक केले.

# बोखारा ग्रामपंचायतीत खळबळ! तत्कालीन ग्रामविकास अधिकारी निलंबनानंतर सरपंचांवर अपात्रतेची टांगती तलवार!

### प्रशासकीय व आर्थिक गैरव्यवहार भोवला

***ग्रामविकास अधिकारी माधुरी लाड निलंबित सरपंच रणजित चौहान यांच्या विरुद्ध कलम ३९ (१) अन्वये कार्यवाही सुरू***

**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

कामठी तालुक्यातील मौजा बोखारा ग्रामपंचायतीमधील आर्थिक आणि प्रशासकीय गैरव्यवहाराचे गंभीर प्रकरण उघडकीस आल्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनाने मोठी धडक कारवाई केली आहे या घोटाळ्याप्रकरणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी तत्कालीन ग्रामविकास अधिकारी माधुरी लाड यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई केली आहे तर दुसरीकडे गैरव्यवहारांचे केंद्रबिंदू ठरलेले सरपंच रणजित चौहान यांच्यावरही महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३९ (१) अंतर्गत अपात्रतेची कारवाई सुरू करण्यात आल्याने संपूर्ण जिल्ह्यात राजकीय व प्रशासकीय वतुर्ळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

आमदार समीर मेघे यांनी केलेल्या तक्रारीनंतर पंचायत समिती नागपूरच्या गटविकास अधिकाऱ्यांमार्फत या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली होती. या चौकशी अहवालातून ग्रामपंचायतीच्या कारभारातील अनेक धक्कादायक आणि नियमबाह्य प्रकार समोर आले आहेत बांधकाम साहित्याच्या ऑनलाइन निविदा प्रक्रियेत सर्वात कमी दर असलेल्या पुरवठादाराने असमर्थता दर्शवल्यानंतर इतर निविदाधारकांनी नकारपत्र दिले असतानाही, परस्पर तिसऱ्या क्रमांकाच्या निविदाकाराला मंजुरी देऊन कार्यादेश देण्यात आले. इतकेच नव्हे तर, पाणीपुरवठा योजनांमधील साहित्य पुरवठ्याची संशयास्पद देयके काढणे, जुलै २०२६ मधील मासिक सभेच्या अधिकृत इतिवृत्तात परस्पर फेरफार करणे आणि १५ व्या वित्त आयोगासह सामान्य निधीचा मनमानी वापर करणे, अशा गंभीर अनियमितता उघड झाल्या.

या सर्व गैरकारभाराचा ठपका ठेवत माधुरी लाड यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना तात्काळ निलंबित करण्यात आले असून चौकशी पूर्ण होईपर्यंत मुख्यालय न सोडण्याचे आदेश बजावण्यात आले आहेत.

अधिकाऱ्यावरील कारवाईनंतर आता या गैरव्यवहारांचे धागेदोरे सरपंचांपर्यंत पोहोचले असून सरपंच रणजित चौहान यांच्याभोवतीही कारवाईचा फास आवळला गेला आहे मासिक सभेची कोणतीही मंजुरी अथवा ठराव नसताना परस्पर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची खरेदी करणे, नियमानुसार कार्यरत कर्मचाऱ्यांची मनमानी पद्धतीने बेकायदेशीर हकालपट्टी करणे आणि स्वतःसह कुटुंबीयांच्या नावे असलेल्या मालमत्तांचा ग्रामपंचायत कर अनेक वर्षांपासून थकीत ठेवून पदाचा गैरवापर करणे, असे गंभीर आरोप चौहान यांच्यावर निष्पन्न झाले आहेत.

या सर्व कारणांमुळे त्यांच्याविरुद्ध पदमुक्तीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. एकाच वेळी ग्रामविकास अधिकारी निलंबित झाल्याने आणि सरपंचांच्या अपात्रतेची सुनावणी अंतिम टप्प्यात आल्याने बोखारा ग्रामपंचायतीच्या कारभारातील मनमानी चव्हाट्यावर आली असून लवकरच यावर काय अंतिम निर्णय होतो याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# जगातील सर्वात उंच पुलावरून १०० किमी प्रतितास वेगाने धावली ट्रेन

**वृत्तसंस्था, जम्मू**
भारतीय रेल्वेने जम्मू-काश्मीरमध्ये ११७८ फूट उंचीवर बांधलेल्या जगातील सर्वाधिक उंच चिनाब रेल्वे पुलावरून वंदे भारत एक्स्प्रेस ताशी १०० किमी वेगाने यशस्वीपणे पार केली. इतकेच नव्हे, तर वंदे भारत एक्स्प्रेसने भारतातील पहिल्या केबल-स्टे प्रकारातील अंजी पुलावरूनही ताशी १०० किमी वेगाने प्रवास केला.

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी याचा व्हीडीओ शेअर करून हा ऐतिहासिक क्षण असल्याचे म्हटले. या यशस्वी चाचणीनंतर १११ किलोमीटर लांबीच्या श्री माता वैष्णोदेवी कटरा-बनिहाल मार्गावरील कमाल रेल्वे वेग ताशी ७५ किमीवरून ताशी १०० किमी करण्यात आला आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील एका पोस्टमध्ये रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटले आजचा दिवस ऐतिहासिक आहे. आज वाढीव वेगाची यशस्वी चाचणी घेण्यात आली.



वंदे भारत एक्स्प्रेसने जगातील सर्वाधिक उंचीवरील चिनाब पूल आणि भारतातील पहिला केबल-स्टे असलेला अंजी पूल १०० किमी प्रतितास वेगाने पार करून नवा विक्रम प्रस्थापित केला. यामुळे यूएसबीआरएल प्रकल्पावर रेल्वेगाडीचे संचालन सुलभ होईल, प्रवासाचा वेळ कमी होईल आणि प्रवाशांना जलद, सुरक्षित व आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळेल.

२ मे पासून वंदे भारत सुरू झाली होती

जून २०२५ मध्ये काश्मीर रेल्वे लिंकचे काम पूर्ण झाल्यानंतर वंदे भारत एक्स्प्रेस सुरुवातीला कटरा आणि श्रीनगरदरम्यान चालवण्यात आली होती. एप्रिल २०२६ मध्ये ती जम्मू तवीपर्यंत वाढवण्यात आली. तसेच ट्रेनमधील डब्यांची संख्या आठवरून २० करण्यात आली. रेल्वे मंत्रालयानुसार, जम्मू-श्रीनगरदरम्यान नियमित सेवा २ मे रोजी सुरू झाली. रेल्वे मंत्रालयाने ऑगस्टमध्ये सांगितले होते की, आता सुमारे ८१% नेटवर्क ११० किमी प्रतितास किंवा त्याहून अधिक वेगासाठी अपग्रेड करण्यात आले आहे. २०१४ मध्ये हा आकडा सुमारे ४०% होता.

## थोडक्यात

### राष्ट्रपीता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचे स्मरण



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**
२ ऑक्टोबर रोजी गांधी जयंतीनिमित्त राष्ट्रपतींनी महात्मा गांधींचे मोठ्या उत्साहात स्मरण केले, तसेच देशाचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्रीजी यांचा जन्मदिनही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गांधी जयंतीनिमित्त शहरातील मान्यवरांनी शहराच्या मध्यभागी असलेल्या गांधींच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला तर शहरातील अनेक संस्थांनी ग्रामस्वच्छता अभियान, रक्तदान अभियान आदींचे आयोजन करून महात्मा गांधींचे स्मरण केले. कृषीक्रांती आणि देशाच्या सीमेवर जय जवान जय किसानचा नारा देणारे लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.तरुणांना प्रोत्साहन देऊन देशाच्या समृद्धीचा मार्ग मोकळा करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे देशाचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या चलचित्राला पुष्पहार अर्पण करूनही स्मरण केले.

याप्रसंगी शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पवन जैस्वाल, सचिव दिपक बसवार, नगरसेवक सुनील चाफेकर, शहर काँग्रेस कमेटीचे उपाध्यक्ष दिलीप घटे, अरुण कळंबे, राहुल धोंगडे, सैदू शेख आदींनी महात्मा गांधींच्या पुतळ्याला माल्यार्पण केले.

### दिवाणी न्यायालय, सावनेर येथे जागतीक ज्येष्ठ नागरिक दिवस साजरा

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**
दिवाणी न्यायालय, सावनेर येथे तालुका विधी सेवा समीती, सावनेर आणि तालुका बार असोसियेशन, सावनेर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतीक ज्येष्ठ नागरिक दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. शेकडोंच्या संख्येत उपस्थित ज्येष्ठ नागरिक, पक्षकार तसेच अधिवक्ता मंडळी यांना आर. एस. मानकर, अधिवक्ता आणि अभिषेक मुलमुले, अधिवक्ता, दिवाणी न्यायालय, सावनेर यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या कायदयांबाबत सखोल आणि तपशीलवार माहीती उपस्थितांना करुन दिली. मा. एम. जे. मोहोड, अध्यक्ष, तालुका विधी सेवा समीती तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सावनेर यांनी आपल्या अध्यक्षीय उदबोधना व्दारे उपस्थितांना आव्हान केले की, कोणीही ज्येष्ठांना दुखवु नका त्यांच्या समस्या जाणुन घेवुन त्या समस्यांचा प्रामाणीकपणे निराकरन करुन ज्येष्ठांना समाजात सन्मानाने जगण्यास मदत करा.



कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन मा. पी. पी. ठाकुर, सह दिवाणी न्यायाधीश तथा अति. मुख्य न्यायदंडाधीकारी सावनेर उपस्थित होते तसेच मंचावर ए. वाय. निंबाळकर, सचिव, तालुका वकील संघ, सावनेर, हे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अँड् चंद्रकांत पिसे, अधिवक्ता, दिवाणी न्यायालय, सावनेर आणि आभार प्रदर्शन पी. एम. माहुलकर, अधिवतक्ता, दिवाणी न्यायालय, सावनेर यांनी केले. सर्व न्यायालयीन कर्मचारीवृंद आणि तालुका बार असोसियेशन, सावनेर यांच्या सहकायार्मुळे कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यात आला.

### रविन्द्र राऊत यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**
५६ रा. सटवा माता मंदिर परिसर, सावनेर याचं शुक्रवारी सायंकाळी पाच वाजता हृदयविकाराचे झटक्याने निधन झाले. त्यांच्या मागे तिन मुली व नातवंडे असा अपत्य परिवार आहे. उद्या दिनांक ३ आक्टोबर सकाळी ११ वाजता त्यांच्या निवासस्थान येथुन अंत्येष्टी गडकरी मोक्षधाम येथे निघेल असे त्यांच्या निकटवर्तीयांनी सांगितले.

### सावनेर तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत सेंट अँन्सच्या विद्यार्थ्यांचे यश



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली सावनेर तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा १ ऑक्टोबर २०२६ रोजी नागपूर विद्यापीठ, रविनगर येथील मैदानावर पार पडली. या स्पर्धेत सेंट अँन्स इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध पदके पटकावली.

१४ वर्षे वयोगटात स्वरा इंगोले हिने ६०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक, तर वेदिका इंगोले हिने ६०० मीटरमध्ये रौप्य व १०० मीटरमध्ये कांस्यपदक मिळविले. १७ वर्षे वयोगटात भूपेश गोरे याने ३००० मीटर धावण्यात सुवर्णपदक पटकावले. ४१०० मीटर रिले शर्यतीत अवनी भक्ते, स्वरा इंगोले, अरीबा सय्यद आणि वेदिका इंगोले यांच्या संघाने कांस्यपदक मिळविले. या यशाबद्दल प्राचार्या सिस्टर क्लिओफस, व्यवस्थापिका सिस्टर सिरीया, सिस्टर प्रीती, क्रीडा विभागप्रमुख खुशाल इंगोले, क्रीडा शिक्षक प्रतीक उमप, सिद्धार्थ माघाडे, सपना कोकाटे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.

## सत्य, अहिंसा व राष्ट्रसेवेचा संदेश देत गांधी-शास्त्री जयंती साजरी




**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
साने गुरुजी ज्येष्ठ नागरिक मंडळ, उमरेडच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे माजी अध्यक्ष प्रभाकरराव लांजेवार होते.

यावेळी प्रमुख वक्ते प्रकाश वाघमारे, गजानन दिघे, दिवाकर वंजारी आणि मंगला व्यवहारे यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. सत्य, अहिंसा, साधेपणा, स्वावलंबन, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रसेवेचा त्यांनी दिलेला संदेश आजच्या काळातही समाजासाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी असल्याचे वक्त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी यांचे आवडते वैष्णव जन तो तेणे कहिये या भजनाचे भावपूर्ण गायन सोहन तिवारी यांनी केले. यानंतर मान्यवरांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना अभिवादन करून त्यांच्या राष्ट्रसेवेच्या कार्याचे स्मरण केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राम तांबडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रकाश जुमडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गंगाधर काटवले यांनी मानले. याप्रसंगी मंडळाचे उपाध्यक्ष मधुकर फुकट, कोषाध्यक्ष शरद व्यवहारे, सहसचिव रामू धोटे, सचिव दादोजी गोखले, कार्यकारिणी सदस्य दुधराम गायधने, मनोहर तोंडे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, सदस्य तसेच अनेक ज्येष्ठ नागरिक व मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमातून महात्मा गांधी यांच्या सत्य व अहिंसेच्या विचारांसह लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रनिष्ठेच्या आदर्शांचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या विचारांचा समाजजीवनात अंगीकार करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

## तुफान गर्दीत शिवाजी पार्कवर सीजेपीचे आंदोलन सुरू

**मुंबई :** केंद्रीय निवडणूक आयोगात अंतर्गत मतभेद असल्याची माहिती समोर आल्यानंतर देशभरात खळबळ उडाली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याची मागणी करत देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली होती.



या पार्श्वभूमीवर शुक्रवार दि. २ ऑक्टोबर सीजेपीच्यावतीने मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर जेलभरो आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला राज्यभरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली असून निवडणूक आयोगाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात येत आहे. दुसरीकडे सीजेपीच्या या जेलभरो आंदोलनाविरोधात झेन नेक्स्टचे आंदोलन सुरू आहे. त्यामुळे मुंबईत चांगलंच राजकारण तापल्याचं पाहायला मिळत आहे. सीजेपीच्या या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारली होती. त्यामुळे हे आंदोलन होणार की नाही? असा संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, सीजेपीचे हे आंदोलन सुरू झाले आहे.

## राष्ट्रीय आदर्श विद्यालय प्राथमिक विभागात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी




**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
राष्ट्रीय आदर्श विद्यालय प्राथमिक विभाग रामटेक येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंतीचे औचित्य साधून प्रभात फेरी, शाळा स्वच्छता, व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धेत गट अ बालवाडी विभाग मधून प्रथम आर्यन बावणे, द्वितीय समर्थ मोहन कर, तृतीय शिवम पांद्रे. गट ब वर्ग पहिली व दुसरी मधून श्रावी ठाकरेले प्रथम, जुबिया कुरेशी द्वितीय, निकुंज डोंगरे तृतीय, तनिष्का सोनकुसरे चतुर्थ, अनिका सोनवणे पंचम. गट क वर्ग तिसरा व चौथा मधून नैनिताबुदे प्रथम, अर्णव पंधराम द्वितीय, नित्या पापडकर तृतीय,गर्ग टोंगसे चतुर्थ, ध्रुवी कुंभलकर पंचम अनुक्रमे ठरले.

कार्यक्रमाचे संचालन गर्ग टोंगसे तर आभार प्रदर्शन ओवी नगरे हिने केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक मंडळाचे सदस्य होमराज हजारे, प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त प्रचार्य जांभुळकर मॅडम उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक निलेश टोंगसे, दिलीप जांभुळे,प्रियंका हांडे, अनिता देशमुख, रोशनी सावरकर, दुर्गा भोंगाडे, सुहास महाजन, सौ डोंगरे यांनी मोलाचे सहकार्य दिले.

## वन्यजीव सप्ताहानिमित्त पवनी येथे जनजागृती रॅली, सालईत पाळीव जनावरांचे लसीकरण व मार्गदर्शन शिबिर

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
नागपूर वनविभागांतर्गत पवनी (प्रादेशिक) वनपरिक्षेत्राच्या वतीने वन्यजीव सप्ताह २०२६ निमित्त विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. वन्यजीव संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि मानव-वन्यजीव यांच्यातील सहअस्तित्वाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने १ ऑक्टोबर रोजी जय सेवा हायस्कूल, पवनी येथे जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीत शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

त्यानंतर २ ऑक्टोबर रोजी मौजा सालई येथे वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्र, माफसू आणि पशुसंवर्धन विभाग, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने अधिवास जोडूया, वन्यजीव फुलवूया, या संकल्पनेअंतर्गत पाळीव जनावरांचे भव्य लसीकरण व मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. जंगलालगतच्या गावांतील पाळीव जनावरांना विविध संसर्गजन्य आजारांपासून सुरक्षित ठेवणे तसेच वन्यजीव आणि पाळीव प्राण्यांमधील आरोग्याचे संतुलन राखणे हा या शिबिराचा प्रमुख उद्देश होता.




मानवी हस्तक्षेपामुळे वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासावर निर्माण होणारा दबाव लक्षात घेता वन्यजीवांचे संरक्षण आणि त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे संवर्धन ही काळाची गरज आहे. वन्यजीव सप्ताहाच्या माध्यमातून ही जनजागृती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न वनविभागाच्या वतीने करण्यात आला.

हा कार्यक्रम उपवनसंरक्षक डॉ. विनिता व्यास, नागपूर वनविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. यावेळी सहाय्यक वनसंरक्षक जी. एफ. लुचे, रामटेक, डॉ. मयूर पावसे, डॉ. झटाळे, वनपरिक्षेत्र अधिकारी एस. एस. बनसोड, सालईचे पोलिस पाटील भारतजी वंजारी, सातपुडा फाउंडेशनचे सदस्य, तसेच जय सेवा हायस्कूलचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वनविभागातील वाय. बी. पाटील, व्ही. एन. कोल्हे, एन. एस. उईके, आर. पी. चाके, एस. डी. गुर्वे, लक्ष्मण अतकुलवार, व्ही. डी. खापर्डे, दिलीप जाधव, अनुप चिखलोंडे, सहदेव वायबसे, संकेत निमजे, आदित्य शेंडे, नेतलाल शिंदे मेश्राम, राजू परतेती, पी. एस. गराडे, भारती काळे, एस. एस. गुर्वे, सचिन मरसकोल्हे, मयूर पंचबुद्धे, गजू राऊत, विठ्ठल सोडगीर, दसवंत कोकोडे यांच्यासह पवनी वनपरिक्षेत्रातील सर्व वनमजूर व पवनी, हिवरा बाजार येथील RRT पथकाने सहकार्य केले. वन्यजीवांचे संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि मानव-वन्यजीव सह अस्तित्वाचा संदेश देत वन्यजीव सप्ताह २०२६ अंतर्गत आयोजित हे उपक्रम यशस्वीरीत्या पार पडले.

## राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांना महावितरणचे विनम्र अभिवादन!

### 'विद्युत भवन' येथे ध्वजारोहण व प्रतिमांना माल्यार्पण, मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या हस्ते मानवंदना

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेचे आजन्म उपासक, राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच देशसेवेचे मूर्तिमंत उदाहरण आणि जय जवान, जय किसानचा अजरामर नारा देणारे भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त महावितरणच्या नागपूर परिमंडळ मुख्यालयात (विद्युत भवन) दोन्ही महान सुपुत्रांना भावपूर्ण व विनम्र अभिवादन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी महावितरणचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या शुभहस्ते राष्ट्रध्वज फडकवून गांधीजींच्या विचारांना आणि त्यांच्या अतुलनीय देशसेवेतील योगदानाला मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश देण्यात आला.

त्यानंतर आयोजित मुख्य अभिवादन कार्यक्रमात मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना भावपूर्ण माल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी अधीक्षक अभियंते अमित परांजपे, संजय वाकडे व दीपाली माडेलवार, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) सुधीर टेकाम व प्रशांत ठाकरे यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख, वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मैदानी स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालयाचे सुयश

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ मैदान रवीनगर नागपूर येथे संपन्न झालेल्या सावनेर तालुकास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करून प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक प्राप्त केले. यात १७ वर्षे वयोगटात अनुराग गुप्ता १०० मीटर व २०० मीटर धावणे दोन्ही क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक प्राप्त केला. तर १९ वर्षे वयोगटात सचिन उईके लांब उडी व तिहेरी उडीमध्ये प्रथम क्रमांक पटकावला असुन खेळाडूंना क्रीडाशिक्षक धैर्यशील सुटे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राविण्य प्राप्त खेळाडू नागपूर येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत सावनेर तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.



महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक व विश्वस्त सुनिल केदार, अध्यक्ष सुधीर केदार, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक जितेंद्र ठाकरे,पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे, क्रीडा शिक्षक धैर्यशील सुटे, धर्मेंद्र सूर्यवंशी, सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वर्ग यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले.